cmyk

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३१ | शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

### बळीराजाने किती किंमत मोजायचीय !

चंद्रपूरमधील एका शेतकऱ्याला खासगी सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकावी लागली. हे प्रकरण उघड होताच राज्यात खळबळ उडाली. लाखांचा पोशिंदा असे ज्याचे वर्णन समाज करतो, त्याला मात्र त्याच्या पोटाची खळगी भरण्यासाठी असे पाऊल उचलावे लागले.

# सीसीआयच्या जाचक अटींमुळे कापूस उत्पादक अडचणीत !

## हमी भावासाठी शेतकऱ्यांची धावपळ मात्र नोंदणीसाठी उरले केवळ १३ दिवस

पुणे । प्रतिनिधी

**कापूस उत्पादकांना हमी भाव मिळावा म्हणून सुरू करण्यात आलेल्या सीसीआयच्या हमी केंद्रांवरील नोंदणी प्रक्रियेला आता केवळ १३ दिवस शिल्लक आहेत. मात्र किचकट ऑनलाइन नोंदणी, अप्रूव्हल आणि स्लॉट बुकिंगमुळे हजारो शेतकरी अडचणीत सापडले आहेत.**

कापूस उत्पादक शेतकऱ्यांना खुल्या बाजारातील घसरलेल्या दरांपासून दिलासा देण्यासाठी केंद्र शासनाच्या वतीने कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया मार्फत राज्यात कापूस हमी खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत. मात्र या हमी केंद्रावर कापूस विक्री करण्यासाठी आवश्यक असलेली ऑनलाइन नोंदणी आणि मंजुरी प्रक्रिया अत्यंत किचकट ठरत असून, नोंदणीच्या अंतिम मुदतीला आता केवळ १३ दिवस शिल्लक राहिले आहेत.



आतापर्यंत अनेक शेतकऱ्यांसाठी कापूस विक्रीसाठी नोंदणी केली असली, तरी त्यापैकी खूप कमी शेतकऱ्यांना सीसीआयकडून मंजुरी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे निम्म्याहून अधिक शेतकरी या प्रक्रियेच्या बाहेर राहिले असून, त्यांच्यासमोर कापूस विक्रीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दुसरीकडे खुल्या ▶▶ पान २ वर

# साखरेच्या दरावर दबाव निर्यात कोटा वाढवा !

## राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाची केंद्राकडे मागणी

पुणे । प्रतिनिधी

**साखरेच्या दरात आणखी घसरण होऊ नये, यासाठी साखर निर्यातीचा कोटा वाढवावा आणि अतिरिक्त पाच लाख टन साखर इथेनॉल उत्पादनाकडे वळवावी, अशी मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने केंद्राकडे केली आहे. चालू हंगामात साखर उत्पादनात मोठी वाढ होण्याची शक्यता आहे. यासाठी साखर कारखाना महासंघाने देशांतर्गत साखरेचा दर स्थिर ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी विनंतीही केली आहे.**



राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले आहे की, सरकारने वेळेवर आणि सकारात्मक निर्णय घेतल्यास साखर कारखान्यांना, विशेषतः आर्थिक बोजा वाढत असलेल्या कारखान्यांना मोठा दिलासा मिळेल. ते पुढे म्हणाले की, साखरेची जास्त निर्यात आणि साखर अधिक प्रमाणात इथेनॉलकडे वळविल्यास बाजारातील अतिरिक्त साखरेचा साठा खपण्यास मदत होईल. तसेच तिला किमान विक्री दरही मिळेल. इंडियन शुगर अँड बायो-एनर्जी ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### शिल्पकार राम सुतार यांचे निधन

मुंबईः महाराष्ट्रातील प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांचे निधन झाले आहे. त्यांना राज्य सरकारने नुकतेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित केले होते. हा राज्याचा सर्वोच्च नागरी पुरस्कार आहे. उत्तर प्रदेशातील नोएडा येथील राहत्या घरी वयाच्या १०० व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राम सुतार यांनी गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा उभारला होता. नुकतेच राम सुतार यांना महाराष्ट्राचे मुध्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या नोएडा येथील घरी जाऊन महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार दिला होता. त्यांनी शिल्पकला क्षेत्रात केलेल्या दैदिप्यमान कामांसाठी त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता.

### गडकिल्ल्यांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी समिती

मुंबईः महाराष्ट्राचे वैभव असलेल्या ऐतिहासिक गडकिल्ल्यांच्या संरक्षणासाठी महायुती सरकारने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मंत्रिमंडळ बैठकीत गडकिल्ल्यांवरील अतिक्रमणे हटविण्यासाठी सांस्कृतिक मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या समितीचे सहअध्यक्ष म्हणून महसूल मंत्री, वन मंत्री आणि मत्स्यव्यवसाय तथा बंदरे मंत्री यांची नियुक्ती करण्यात आल्याची माहिती मंत्री नितेश राणे यांनी दिली. काही ठिकाणी थडगी उभी करून हिरवी चादर टाकली जाते. अशी थडगी किंवा अनधिकृत बांधकामे हटवायला गेले की लोक जमा होतात. अनेक वेळा अशा ठिकाणी हत्यारेही सापडली आहेत. इतिहास पुसण्याचे काम जिहादी मानसिकतेच्या लोकांकडून होत आहे. आमच्या गडकिल्ल्यांवर कोणाची वाकडी नजर खपवून घेणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

### गांधीजींसारखा देश फिरा, म्हणजे वास्तवता समजेल

नवी दिल्लीः देशाच्या एका मोठ्या भागात लोकांना साधे पिण्याचे पाणीही नशिबात नाही. अशा परिस्थितीत पाण्याची गुणवत्ता हा मुद्दा नंतर येतो. ग्रामीण भागात लोक अजूनही जमिनीतील पाणी पितात. तुम्ही बाटलीबंद पाण्यात कोणता घटक टाकावा किंवा कोणता काढावा, यासाठी न्यायालयाकडून निर्देश मागत आहात, हा एक चैनीचा विषय आहे. जेव्हा महात्मा गांधी दक्षिण आफ्रिकेहून परतले, तेव्हा त्यांनी संपूर्ण देशाची यात्रा केली होती. याचिकाकर्त्यानेही भारताची खरी परिस्थिती समजून घेण्यासाठी देशाच्या विविध भागांत जाऊन लोक कोणत्या प्रकारचे पाणी पीत आहेत, याची पाहणी करावी, '' अशा कडक शब्दांमध्ये ताशेरे ओढत सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी देशातील बाटलीबंद पाण्याच्या गुणवत्तेच्या विद्यमान मानकांना आव्हान देणारी याचिका गुरूवारी (दि. १८) फेटाळली.

### फडणवीस यांनी घेतला प्रलंबित विषयांचा आढावा


मुंबईः लोकहितांच्या योजनांसाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना अधिकाधिक सुलभ आणि सहज सुविधा उपलब्ध होतील यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सारख्या नवीन तंत्रज्ञानाचा प्रत्येक विभागामध्ये वापर करण्यात यावा. महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर नेणाऱ्या योजनांना गती देण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाचा विस्तार करतांना त्यामध्ये आयटी, इलेक्ट्रॉनिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांचा समावेश करावा असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली शंभर दिवसांच्या कार्यक्रमातील प्रलंबित विषयांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीस मुख्यमंत्र्यांच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव श्रीकर परदेशी तसेच संबधित विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

# लोकसभेत प्रचंड गदारोळात 'विकसित भारत जी राम जी' विधेयक मंजूर

नवी दिल्ली । वृतसंस्था

**लोकसभेत गुरुवारी प्रचंड गदारोळात 'विकसित भारत जी राम जी' (व्हिबी – जी राम जी) विधेयक मंजूर करण्यात आले. या चर्चेदरम्यान विरोधी पक्षाच्या खासदारांनी आक्रमक पवित्रा घेत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या दिशेने कागद भिरकावल्याने सभागृहात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.**

गेल्या अनेक दिवसांपासून या विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष सुरू आहे.




सरकारने या योजनेतून महात्मा गांधींचे नाव जाणीवपूर्वक हटवल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. तर 'विकसित भारत'चे व्हिजन डोळ्यासमोर ठेवूनच योजनेत हे बदल करण्यात आल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. शिवराज सिंह चौहान म्हणाले की, मी रात्री दीड वाजेपर्यंत सन्माननीय सदस्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आहे. आता उत्तर देणे हा माझा अधिकार आहे, परंतु केवळ स्वतःचे म्हणणे मांडायचे आणि सरकारचे उत्तर ऐकून न घेणे, ही लोकशाहीची थट्टा आहे. हे संविधानाच्या चिंधड्या उडवण्यासारखे असून बापूंच्या (महात्मा गांधी) आदर्शांची हत्या करण्यासारखे ▶▶ पान २ वर

# माणिकराव कोकाटेंना कोणत्याही क्षणी अटक

मुंबई । पतिनिधी

### अजित पवारांनी राजिनामा स्वीकारल्याने कारवाईचा मार्ग मोकळा

**राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा अखेर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वीकारला आहे आणि तो मुख्यमंत्र्याकडे पाठवला आहे. यानंतर नाशिक पोलिस मुंबईकडे रवाना झाले असल्याचे समोर आले असून, माणिकराव कोकाटे यांना कोणत्याही वेळी अटक होण्याची शक्यता आहे.**



माणिकराव कोकाटे सध्या मुंबईतील लिलावती रूग्णालयात आहेत. ज्या ठिकाणाहून त्यांना अटक करण्यासाठी रवाना नाशिक पोलिसांची टीम रवाना झालेली आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर लिलावती रूग्णालयाबाहेर मोठ्या प्रमाणात गार्ड तैनात करण्यात आले आहेत. माणिकराव ▶▶ पान २ वर

# कोकाटेंचे झाले आता मंत्री सिरसाटांची बारी

## व्हिट्स हॉटेल प्रकरणाची 'हाय पॉवर कमिटी' मार्फत होणार चौकशी

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

अजित दादाच्या राष्ट्रवादीचे व राज्याचे क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या सदनिका खरेदी घोटाळ्याने राजीनामा द्यावा लागल्याचे प्रकरण आणखी शांत झाले नाही तोच शिंदे शिवसेनेचे मंत्री संजय सिरसाट यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे.

मंत्री संजय सिरसाट यांच्यावर येथील विट्स हॉटेल (धनदा कॉर्पोरेशन) गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारने एक हाय पॉवर समिती नियुक्त केली आहे. ही समिती या संपूर्ण प्रकरणाचा ८ दिवसांच्या आत तपास करून आपला अहवाल सादर करणार आहे.



छत्रपती संभाजीनगर येथील ११० कोटींचे सुप्रसिद्ध हॉटेल व्हिट्स अवघ्या ६८ कोटींत खरेदी करण्याचा कथित प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर सिरसाट यांनी या सौद्यातून काढता पाय घेतला. पण आता या ▶▶ पान २ वर

# मजुरांना घेऊन जाणाऱ्या टेम्पोचा अपघात ; एक ठार, २० जखमी

जालना । प्रतिनिधी

**जालन्यात अपघाताची भीषण दुर्घटना घडली आहे. शेतीचे काम करण्यासाठी घेऊन जाणाऱ्या कामगारांचा टेम्पो उलटल्याने मोठा अपघात झाला. या अपघातात एकजण ठार असून, २० कामगार जखमी झाले आहेत. जालना जिल्ह्यातील राजूर- टेंभुर्णी रोडवरील देळेगव्हाण येथे गुरूवारी सकाळी दहा वाजाता हा अपघात झाला.**

भोकरदन तालुक्यात आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी आलेल्या मजुराच्या टेम्पोचा भीषण अपघात झाला आहे. हा अपघात एका स्कुटी चालकाला वाचवण्यासाठी झाला. पण टेम्पो चालकाला त्यात यश आले नाही. या घटनेत स्कुटी चालकाचा जागीच मृत्यू झाला तर टेम्पोत बसलेले २० कामगार गंभीर जखमी झाले आहेत. शेतातील अद्रक काढण्यासाठी हे २० कामगार टेम्पोतून जात होते. यावेळी देळेगव्हाण येथे अचानक स्कुटी समोर आली. त्या स्कुटीला वाचवताना टेम्पो पलटी झाला. हा अपघात जिथे घडला त्याच ठिकाणी २ महिन्यापूर्वी भरधाव कार एका पादचाऱ्याला वाचवण्याच्या गडबडीत सिमेंटचे कठाडे तोडून विहिरीत गेली होती. ▶▶ पान २ वर

# गेवराईत दिवसाढवळ्या तरुणीचे अपहरण

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातल्या थरारनाट्याचा पोलीसांनी काही तासांत छडा लावला. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या मुलीचे अपहरण झाले होते. काही तासातच पोलीसांनी मुलगी शोधून काढल्याने, गेवराई पोलीसांचे कौतुक केले जात आहे. मात्र यातील आरोपी फरार झाले असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

शहरातील पंचायत समिती जवळ असलेल्या चौकातून एका मुलीला गाडीत टाकून पळवून नेल्याची घटना गुरूवारी दुपारी १२ वाजता घडल्याने खळबळ उडाली. सदरील मुलगी कॉलेज मधून पंचायत समिती जवळून ▶▶ पान २ वर

# जामखेडमध्ये रोहित पवारवर गोळीबार; हल्लेखोर पसार

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड शहरातील बीड रोडवरील हॉटेल कावेरी या ठिकाणी हॉटेलची तोडफोड करीत केलेल्या गोळीबारात हॉटेल मालक रोहित पवार गंभीर जखमी झाला आहे. तसेच चारचाकी गाडीची देखील तोडफोड करण्यात आली असून, मागील भांडणाच्या कारणावरून गोळीबार करण्यात आल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.




याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, बुधवारी रात्री हॉटेल मालक रोहीत अनिल पवार (वय २७) हा हॉटेलवर गिऱ्हाईक पहात होता. यावेळी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास सात ते आठ जणांच्या टोळीने हॉटेलवर येत हल्ला करून तोडफोड केली. तसेच रोहीत पवार याच्यावर गोळीबार केला. या गोळीबारात त्याच्या पायाला ▶▶ पान २ वर

# हिवाळी अधिवेशन @अजितदादांचा दरारा..

## पार्थ च्या जमिन घोटाळ्यात ३६६ आमदारांची चुप्पी




बीड–मुंबई । सुभाष चौरे

**राज्याच्या राजकारणामध्ये दादा म्हणून अजित पवारांची ओळख आहे. त्यांना आदराने दादा म्हणतात परंतु दादा सारखेच काम राजकारणातही ते करताना दिसत आहेत. नुकत्याच झालेल्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये पुत्र पार्थ पवार यांच्या मुंडव्यातील १८०० कोटीच्या जमीन घोटाळ्यात सभागृह दणाणून जाईल, अशी आशा जनतेला होती. मात्र दादांच्या दरारापुढे विधानसभेतील २८८ आणि विधान परिषदेतील ७८ अशा ३६६ आमदारांनी या प्रकरणावर हातावर घडी, तोंडावर बोट ठेवल्याचे पहावयास मिळाले.**

नागपूर येथील हिवाळी अधिवेशन जेमतेम एक आठवड्याचे झाले निवडणुकांचे कारण पुढे करत कालावधी कमी केल्याचे सांगण्यात आले आणि मागच्या शनिवारी या अधिवेशनाचे सूप वाजले. हे अधिवेशन सुरू होण्यापूर्वी राज्याचे



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांचा मुंडव्यातील १८०० कोटी रुपयांचा जमीन घोटाळा चांगलाच गाजला होता. आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुलाचे नाव या घोटाळयात आल्यामुळे विरोधक चांगलाच समाचार घेणार, अशी स्थिती होती. यासोबतच पक्ष फोडला म्हणून काका आणि बहिण, पुतण्या या संधीचा फायदा घेत अजित पवारांना चांगलेच टार्गेट करतील असे वाटले होते. एवढेच काय विरोधात असलेले महाविकास आघाडीचे आमदार हे अजित ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ डिसेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २२.०० क्विंटल | २,३५० | २,९४१ | २,६८२ |
| ज्वारी/हायब्रिड: ३२.५० क्विंटल | २,३१० | ३,८११ | २,८९८ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,३५० | ६,३५० | ६,३५० |
| उडीद :२.०० क्विंटल | ४,८०० | ४,८०० | ४,८०० |
| बाजरी: ३९.५० क्विंटल | २,७१९ | ३,६८० | ३,०८८ |
| मुग: १.०० क्विंटल | ६,१५० | ६,१५० | ६,१५० |
| सोयाबीन: १३२.५० क्विंटल | ४,४५० | ४,५११ | ४,४९० |
| हरभरा: १.०० क्विंटल | ४,१०० | ६,००१ | ५,०५० |

cmyk

## अग्रलेख

# बळीराजाने किती किंमत मोजायचीय !

चंद्रपूरमधील एका शेतकऱ्याला खासगी सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी स्वतःची किडनी विकावी लागली. हे प्रकरण उघड होताच राज्यात खळबळ उडाली. लाखांचा पोशिंदा असे ज्याचे वर्णन समाज करतो, त्याला मात्र त्याच्या पोटाची खळगी भरण्यासाठी असे पाऊल उचलावे लागले. किडनी विकून, ट्रॅक्टर आणि शेती विकूनही ज्याचे कर्ज फिटले नाही त्याने काय करायचे? जिवंत असून उपयोग काय, अशी हतबलता व्यक्त करण्याची वेळ सडलेल्या आणि किडलेल्या व्यवस्थेने त्याच्यावर आणली आहे. त्याच्या व्यथेला पाय फुटले म्हणून, अन्यथा खासगी सावकारीच्या विळख्यात कितीतरी जण मरणयातना भोगत असू शकतील. ज्यांना अजूनही वाचा फुटलेली नसेल.

एक शेतकरी खासगी सावकाराकडून एक लाखाचे कर्ज घेतो. त्या कर्जावर ते सावकार दिवसाला दहा हजार रुपये व्याज आकारतात. कर्जाची रक्कम सुमारे सत्तर लाखांपर्यंत जाते. तगाद्याला कंटाळून शेतकरी दोन एकर जमीन आणि ट्रॅक्टर विकतो तरीही सावकार त्याला एजंटच्या हवाली करतात. तो त्याला कंबोडियात नेऊन त्याची एक किडनी विकतो. ती विकून आलेले आठ लाख रुपये सावकाराच्या हवाली करतो. एका शेतकऱ्याच्या बाबतीत इतक्या अन्यायकारक आणि क्रूर घटना घडत असताना त्याची कानोकान खबर कोणालाही लागू नये? इतके सगळे घडेपर्यंत सरकारी यंत्रणा झोपल्या होत्या का? शेतकऱ्यांच्या हक्कासाठी लढण्याचा दावा करणाऱ्या संघटनांनाही याची खबरबात का लागली नसावी? गावकऱ्यांना देखील याची काहीच कल्पना आली नसेल का? एरवी रस्ते आणि विमानतळावरच्या सुरक्षा व्यवस्थेचा डंका सरकारे वाजवतात. मग त्याला कंबोडियाला नेत असताना सुरक्षा यंत्रणा संपावर गेली होती का? व्यवस्थेतील कोणालाही काहीच शंका आली नाही का? झारीतील शुक्राचार्यांनी नियमांना हरताळ फासल्याशिवाय आणि त्यांच्या पाठबळाशिवाय यंत्रणेला चकवा देण्याची हिंमत सावकार करू शकले नसते. नियमांचा काच नेहमी लाखाच्या पोशिंद्यांच्याच नशिबी आढळतो.

शेतकऱ्यांवर निसर्ग अन्याय करतो. मध्यस्थांची साखळी त्याला नडते. निसर्गाच्या माऱ्याने यंदा तर राज्यातील बहुसंख्य शेतकरी झोपले आहेत. त्यांची शेती मुळापासून उद्ध्वस्त झाली आहे. कोट्यवधींची मदत जाहीर करून, सरकारने पाठ थोपटून घेतली खरी पण शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी ती मदत पोहोचवण्याची कार्यशीलता व्यवस्थेने मात्र दाखवलेली नाही. अनेकांची मदत नियमांच्या कचाट्यात अडकली आहे. त्यावर सरकारने कोणती पावले उचलली ते अद्यापपर्यंत माहीत नाही. पीडित शेतकऱ्यांसाठी हे म्हणजे 'आई भीक मागू देईना आणि बाप जेवू घालेना' असे झाले. त्यांनी कुठे जायचे? सरकार विविध योजना जाहीर करते. कर्ज-वीजबिल माफी केल्याचे अधूनमधून जाहीर केले जाते. त्यावरून अलीकडच्या काळात लोक शेतकऱ्यांची खिल्ली देखील उडवताना आढळतात. सावकाराच्या छळाच्या तक्रारीची दखल पोलिसांनी घेतली नाही. वेळीच ती घेतली असती तर किडनी सुरक्षित राहिली असती अशी खंत त्या शेतकऱ्याने माध्यमांकडे व्यक्त केली. तसे असेल तर तो तर अक्षम्य गुन्हा आहे. कायदा राखण्याची जबाबदारी असणाऱ्यांनी पीडितांना वाऱ्यावर सोडले याची शरम सर्वांना वाटायला हवी. याच निगरगट्टपणाने शेतकरी हतबल होतात. काहीजण टोकाचा मार्ग अनुसरतात. शेतकऱ्यांच्या नशिबी कोणते वास्तव असते? तो जगतो कसा? या वेदनांना चंद्रपूर घटनेने पाय फुटले आहेत. सरकारे येतात आणि जातात, शेतकरी मात्र आहे तिथेच राहातात किंवा त्यांची अधिकाधिक दुर्गतीच होत जाताना दिसते. उपरोक्त घटना उघड होताच राजकारण सुरू झाले आहे. यावर विरोधी पक्ष सरकारला धारेवर धरतील. सरकारही कदाचित खडबडून जागे होऊ शकेल. कडक कारवाईचा इशारा दिला जाईल. दोषींना शोधण्यासाठी समिती नेमली जाईल. कदाचित त्याचे सगळे कर्ज माफ केले जाईल. सावकाराच्या मुसक्या आवळल्या जाऊ शकतील. सगळे काही घडू शकेल. पण ही पश्चातबुद्धी किडनी परत देणार नाही की उर्वरित शेतकऱ्यांची परिस्थिती पालटू शकणार नाही.

एका शेतकऱ्यावर किडनी विकायची वेळ येणे हा मिळून साऱ्यांचा, म्हणजे सरकार, विरोधी पक्ष, शेतकरी संघटना आणि समाज अशा सगळ्यांचा पराभव आहे. अशी दुर्दैवी वेळ यापुढे कोणावरही येऊ नये यासाठीच धोरणात्मक कठोर उपाय योजावे लागतील. यंत्रणेची बधिरता कमी करावी लागेल. खासगी सावकारीची पाळेमुळे खोदावी लागतील. मध्यस्थ व्यवस्थेची झाडाझडती घ्यावी लागेल. झारीतील शुक्राचार्यावर धडा घालून देणारी कारवाई करावी लागेल आणि हे सगळे करताना पारदर्शकपणा राखावा लागेल. पण तेवढे परिश्रम घ्यायचे आहेत कोणाला? इथे तर सरकार कोणाचेही असो, तात्पुरती मलमपट्टी करण्यातच सर्वांना रस आढळतो. त्याची किंमत मात्र बळीराजा मोजतो.

# काँग्रेसची पडझड: आत्मपरीक्षण की आत्मदहन?; दोष 'स्वार्थाचा' की नेतृत्वच्या निर्णयांचा?

काँग्रेस पक्ष आज ज्या विदारक परिस्थितीतून जात आहे, त्याकडे पाहून गेल्या २२-२३ वर्षांपासून निष्ठावंतपणे काम करणारे शिरूर तालुक्याचे माजी तालुकाध्यक्ष रमेश सानप (ज्यांनी विद्यार्थी काँग्रेस, युवक काँग्रेस आणि मुख्य काँग्रेसमध्ये अविरत जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत) यांनी अत्यंत वेदनादायी पण जळजळीत सत्य मांडले आहे.

**निष्ठेचा बाजार आणि नेतृत्वाचा आंधळेपणा**

आज जेव्हा एखादा मोठा नेता काँग्रेस सोडून जातो, तेव्हा ''यांना सगळं दिलं, तरी हे का गेले?'' अशी चर्चा रंगते. पण खरंच दोष फक्त सोडून जाणाऱ्यांचा आहे का? की ज्या घराच्या भिंती कमकुवत झाल्या आहेत, त्या मालकाचा हा पराभव आहे? काँग्रेसच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण म्हणजे घराणेशाहीची आणि मर्जीची लागलेली वाळवी. वर्षानुवर्षे जमिनीवर काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याला डावलून, फक्त प्रस्थापित पुढाऱ्यांच्या वारसांनाच 'रेड कार्पेट' दिले जाते. सामान्य घरातील तरुण, ज्याच्याकडे ना मोठी संस्था आहे ना अफाट संपत्ती, तो फक्त पक्षाचा झेंडा खांद्यावर घेण्यासाठीच जन्मला आहे का? काँग्रेस उमेदवारी ठरवताना तरुणाचे कर्तृत्व पहा इमानदारी पहा, त्याची मालमत्ता, यंत्रणा, त्याचे पैसे, प्रॉपर्टी आणि संस्थेचे कर्मचारी यंत्रणा काही पाहू नका कारण याचं भीती साठी प्रस्थापित पुढारी पक्ष सोडून स्वर्थी राजकारण करत आहेत, दुर्दैवाने, काँग्रेसमध्ये 'लायकी' पेक्षा 'लाईन' महत्त्वाची ठरत आहे, हुजरेगिरी विरुद्ध 'ग्रासरूट' धमक पक्षात आज दोन गट पडले आहेत. एक गट जो दिल्ली-मुंबईच्या वाऱ्या करतो, नेत्यांच्या पुढे-पुढे करतो आणि सोशल मीडियावर फक्त फोटो टाकून 'ऑफिस बिअरर' म्हणून मिरवतो. दुसरा गट तो आहे, जो बूथ स्तरावर उन्हातान्हात लोकांसाठी काम करतोय. दुर्दैवाने, काँग्रेसमध्ये संधी कोणाला मिळते? तर फक्त 'हुजरेगिरी' करणाऱ्यांना. जो कार्यकर्ता वर्षानुवर्षे लोकांच्या सुखादुखात धावतो, त्याची दखल घेणारी कोणतीही यंत्रणा पक्षात अस्तित्वात नाही. हुकून चुकून कुणाला दिलाच तर तो कुठल्या ना कुठल्यातरी काँग्रेस मधल्या लॉबी लाईन मधला समर्थक किंवा शिफारशीतला असतो काँग्रेस स्वतंत्र असं काहीही यंत्रना लावून चेक करत नाही त्याची लाईन कोणाची आहे, त्याला कोणाचा समर्थन आहे, कोण कसं ब्रिफिंग करत, कोण किती ताकत लावत,कोणाची लाईन गांधी घरण्याकडे जास्त आहे, गांधी कुटुंबाला कसं पटवून दिलं जातं त्यावर खासदारक्या, आमदार, पद, अध्यक्ष ठरवले जातात किंवा एखादा मोठा नेता निवर्तला की पुन्हा त्याच्याच घरात उमेदवारी दिली जाते, कार्यकर्त्यांचं मत गृहीत धरलं जात नाही...

**स्व. राजीव सातव व राहुल गांधी आणि 'वारसा' राजकारणाचे उदाहरण**

स्व.राजीव सातव हे राहुल गांधींचे किती जवळचे होते, तरीही त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नीला दोन वेळेस आमदारकी दिली आणि आज त्या भाजपच्या वाटेवर आहेत, ही किती मोठी शोकांतिका आहे! जर त्यांच्या जागी एखाद्या सामान्य कार्यकर्त्याला संधी दिली



असती, तर तो कार्यकर्ता उपकाराच्या भावनेने २४ तास लोकांमध्ये राहिला असता, त्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पक्ष वाढवला असता. पण ही पद्धत काँग्रेसमध्ये नाहीच, म्हणून पक्षाचा ऱ्हास होत आहे. आज काँग्रेसचे नेतृत्व इतके मूर्ख निर्णय घेते की, ज्यांना 'सगळं काही' मिळालं तेच सत्ता जाताच पळ काढतात. मॅनेज्ड' रिपोर्ट्स आणि दिल्ली ते गल्ली चे निरीक्षक प्रोफेशनल ऑडिट आणि 'प्रॅक्टिकल एजन्सी'ची गरज निवडणुकीचे निकाल लागण्यापूर्वी मीडिया एक्झिट पोलच्या माध्यमातून निकाल सांगतो, मग काँग्रेसला स्वतःच्या ताकदीचा अंदाज का येत नाही? प्रत्येक तालुक्यात, जिल्ह्यात खरोखर कोण काम करतंय?

**कोणाची प्रतिमा स्वच्छ आहे?**

कोणाकडे निवडून येण्याची क्षमता () आहे? कोणत्या नेत्याला पक्षात घेतलं पाहिजे इतर पक्षात किंवा सामाजिक क्षेत्रात काम करणारे लोक काँग्रेस पक्ष देऊ शकतात का त्यांना घेतलं तर काय होईल? मला झोप तरी दिला तर काय फरक पडेल पक्ष वाढेल का? हे शोधण्यासाठी पक्षाने एखाद्या कॉर्पोरेट प्रोफेशनल एजन्सीप्रमाणे ऑडिट करणे गरजेचे आहे. जेव्हा रिपोर्ट 'मॅनेज्ड' नसतील, तेव्हाच खऱ्या नेतृत्वाला संधी मिळेल. पक्षात आलेले 'निरीक्षक' हे नेत्यांच्या मर्जीतले असतात. ते कार्यकर्त्यांना भेटण्याऐवजी प्रस्थापितांच्या सोफ्यावर बसून चहा पितात आणि 'मॅनेज्ड' रिपोर्ट दिल्लीला पाठवतात. राहुल गांधींनी आता नेत्यांच्या शब्दावर विश्वास ठेवण्यापेक्षा एखाद्या प्रोफेशनल आणि त्रयस्थ एजन्सीची() एजन्सीची नियुक्ती करावी. जोपर्यंत 'मर्जी'तल्या लोकांची ही साखळी तुटत नाही, तोपर्यंत खरा कार्यकर्ता समोर येणार नाही.

**मागच्या दाराने पदे भोगणारे 'ड्रॉइंग रूम' नेते**

पक्षात 'मागच्या दाराने' राज्यसभा आणि विधान परिषदेवर जाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. हे लोक स्वतः निवडणूक लढायला घाबरतात, पण पदे उपभोगतात. छोट्या-मोठ्या निवडणुकांमध्ये कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडले जाते, त्याला कसलीही ताकद दिली जात नाही. कार्यकर्ता निवडून आला तर पक्षाचा, आणि पडला तर त्याचे घर उद्ध्वस्त झाले तरी नेतृत्वाला फरक पडत नाही. निवडणुकीत स्वबळाचा नारा द्यायचा आणि स्वतःवर वेळ आली की ''पक्षाची ताकद नाही'' म्हणून पळ काढायचा, ही प्रस्थापितांची नीती आहे. ज्या नेत्यांनी काँग्रेसच्या जीवावर मुख्यमंत्री, मंत्री खासदार, आमदार, विविध महामंडळ, संचालक, होऊन बँका, कारखाने आणि शिक्षण संस्था,कॉलेज व गडगंज प्रॉपर्टी कमावली, ते स्वतःच्या मुलाच्या किंवा वारसाच्या इलेक्शनसाठी करोडो रुपये खर्च करतात, पण सामान्य कार्यकर्त्याला झेंडे देण्यापुरतीही त्यांची नीतिमत्ता उरलेली नाही. पक्षाच्या अडचणीच्या काळात हे नेते दोन रुपये खर्च करायला तयार नाहीत. आज अनेक मतदारसंघांत काँग्रेसचा 'पंजा' दिसेनासा झाला आहे. काँग्रेसमधील काही मोजकेच पुढारी हे कार्यकर्त्यांना सांभाळून घेतात, पण बहुतांश प्रस्थापित केवळ स्वतःचे हित पाहतात.

**वारसांना 'रेड कार्पेट' आणि कार्यकर्त्याला 'वनवास'**

पक्षाने प्रज्ञा सातव यांना आमदारकी दिली, पण विचार करा जर त्यांच्या जागी एखाद्या सर्वसामान्य, संघर्ष करणाऱ्या तालुकास्तरावरच्या कार्यकर्त्याला ती संधी दिली असती तर? तो कार्यकर्ता उपकाराच्या भावनेने २४ तास लोकांमध्ये राहिला असता. त्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, वाडी-वस्तीवर जाऊन पक्ष बांधणी केली असती. त्याचे अखखे कुटुंब पक्षासाठी रात्रंदिवस राबले असते, कारण त्याला शून्यातून विश्व निर्माण करण्याची संधी पक्षाने दिली असती. पण काँग्रेसची पद्धतच वेगळी आहे. इथे कोणी वारलं की त्याच्या घरात उमेदवारी द्यायची, कोणी मोठा नेता असेल तर त्याच्या पोराला किंवा बायकोलाच तिकीट द्यायचं, ही 'वारसाहक्काची' साखळी पक्षाला संपवत आहे.

**गांधी कुटुंबाने आता तरी डोळे उघडावेत!**

राहुल गांधी पदयात्रा काढतात, लोकांत जातात हे चांगलेच आहे. पण आता गरज आहे ती 'पक्षांतर्गत शुद्धीकरण मोहिमेची'. जोपर्यंत हुजरेगिरी करणाऱ्यांना घरी बसवून, बूथवर घाम गाळणाऱ्या कार्यकर्त्याच्या हातात ताकद दिली जात नाही, तोपर्यंत ही गळती थांबणार नाही. काँग्रेसला आता नेत्यांच्या नाही, तर निष्पक्ष 'डेटा' आणि 'सर्वे'च्या आधारावर निर्णय घेण्याची गरज आहे. जर राहुल गांधींनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले किंवा त्यांना ग्रासरूटवर येण्याची तसदी घ्यावीशी वाटली नाही, तर पक्षाचा अंतिम समय जवळ आला आहे असे समजावे लागेल. जोपर्यंत सामान्य तरुण आमदार-खासदार होण्याचे स्वप्न पाहू शकत नाही आणि प्रस्थापितांच्या दावणीला बांधलेला हा पक्ष मुक्त होत नाही, तोपर्यंत काँग्रेसला अच्छे दिन येणे शक्य नाही.



**रमेश महादेव सानप**
माजी तालुकाध्यक्ष,
शिरूर तालुका काँग्रेस कमिटी
मो. ७९७२११७००३

# जिल्हा प्रशासनाकडून महानगरपालिका निवडणूक साठी विविध राजकीय पक्षाचे बैठक

जालना । प्रतिनिधी

**राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, यामध्ये जालना महानगरपालिकेसाठी १५ डिसेंबर २०२५ पासून निवडणूक प्रक्रिया अधिकृतपणे राबवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जालना मनपा आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत महत्त्वाची बैठक घेऊन निवडणूक कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. या बैठकीला भारतीय जनता पक्ष, शिवसेना, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट), आम आदमी पार्टी यांसह अन्य नोंदणीकृत पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. निवडणुकी संदर्भात माहिती देण्यात आली.**

जालना महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून, दुसऱ्याच दिवशी म्हणजेच १६ जानेवारी २०२६ रोजी मतमोजणी पार पडणार आहे. मतमोजणीसाठी मे. सिद्दीकी इंजिनीअरिंग, एमआयडीसी ३ रा फेज, जालना या ठिकाणाची निश्चिती करण्यात आली आहे. नामनिर्देशन पत्र (उमेदवारी अर्ज) प्रक्रिया: अर्ज स्वीकारण्याचा कालावधी: २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर २०२५ (सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत). सार्वजनिक सुटी: २५ डिसेंबर आणि २८ डिसेंबर २०२५ रोजी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज मिळण्याचे ठिकाण: निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात अर्ज विक्रीसाठी उपलब्ध आहेत. अर्ज भरण्याची ठिकाणे: जिल्हाधिकारी कार्यालय, मनपा कार्यालय, तहसील कार्यालय आणि उपविभागीय



कार्यालय (जालना) अशा एकूण ५ केंद्रांवर ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारले जातील. छाननी: ३१ डिसेंबर २०२५ (सकाळी ११ वाजल्यापासून). अर्ज मागे घेण्याची मुदत: ०२ जानेवारी २०२६ (दुपारी ३ वाजेपर्यंत). चिन्ह वाटप: ०३ जानेवारी २०२६. उमेदवारांसाठी महत्त्वाच्या अटी व शुल्क: राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, जालना महानगरपालिका 'ड' वर्गात येत असल्याने उमेदवारांसाठी निवडणूक खर्च मर्यादा ९ लाख रुपये निश्चित करण्यात आली आहे. अनामत रक्कम ( ): सर्वसाधारण उमेदवारांसाठी ५,००० रुपये, तर अनुसूचित जाती, जमाती, नामाप्र आणि महिला राखीव उमेदवारांसाठी २,५०० रुपये निश्चित करण्यात आले आहेत. जात वैधता प्रमाणपत्र: उमेदवारांकडे वैधता प्रमाणपत्र नसल्यास, अर्जासोबत पडताळणीसाठी सादर केलेल्या प्रस्तावाची पोच पावती जोडणे अनिवार्य आहे. या अर्जांवर स्वाक्षरीचे अधिकार तहसीलदारांना प्रदान करण्यात आले आहेत. मतदान प्रक्रिया आणि केंद्र: यावेळची निवडणूक बहुसदस्य प्रभाग पद्धतीने होत असून, मतदारांना एका प्रभागात उमेदवारांच्या संख्येनुसार ४ ते ५ मते द्यावी लागणार आहेत. संपूर्ण शहरात एकूण २९१ मतदान केंद्रे असून, प्रत्येक केंद्रावर सरासरी ८०० ते ९०० मतदारांची तरतूद करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी ईव्हीएम (ईव्हीएम) मशिनचा वापर केला जाणार असून, व्हीव्हीपॅट(व्हीव्हीपॅट) उपलब्ध असणार नाही. मतदारांच्या माहितीसाठी ईव्हीएम डेमो (प्रात्यक्षिक) प्रत्येक निवडणूक कार्यालयात उपलब्ध करून दिला जाईल. आचारसंहिता आणि सुरक्षा व्यवस्था: निवडणुकीची घोषणा होताच महानगरपालिका क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेच्या कडक अंमलबजावणीसाठी २३ डिसेंबरपासून एफएसटी (फ्लाइंग स्कॉड), व्हीएसटी आणि एसएसटी पथके कार्यान्वित होतील. संवेदनशील मतदान केंद्रांच्या सुरक्षेबाबत लवकरच पोलीस अधीक्षकांसोबत राजकीय प्रतिनिधींची विशेष बैठक आयोजित करण्यात येईल. एक खिडकी(सिंगल विंडो प्रणाली) उमेदवारांना विविध शासकीय परवानग्या मिळवण्यासाठी प्रशासनाने 'एक खिडकी' सुरू केली असून, एकाच ठिकाणाहून सर्व आवश्यक परवाने दिले जातील. तसेच निवडणूक खर्चाचे नमुने, नियमावली आणि माहिती पुस्तिका १०० रुपयांत २३ डिसेंबरपासून निवडणूक कार्यालयात उपलब्ध होईल. तसेच सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात एक जनसंपर्क अधिकारी नेमण्यात येईल तसेच जालना शहर महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी यांच्याकडे एकत्रित माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## पान १ वरून...

### सीसीआयच्या जाचक अटिंमुळे

बाजारात कापसाचे दर सातत्याने घसरत असल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. या पार्श्वभूमीवर हमी भावाने कापूस खरेदी करण्याचा निर्णय शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे, मात्र प्रत्यक्षात नोंदणी आणि मंजुरीतील अडथळ्यांमुळे अनेक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. सीसीआयच्या सूचनेनुसार ३१ डिसेंबरपर्यंतच कापूस विक्रीसाठी ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत नव्या नोंदी स्वीकारल्या जाणार नाहीत. त्यामुळे या मुदतीत नोंदणी न झाल्यास संबंधित शेतकऱ्यांना पुढील काळात हमी केंद्रावर कापूस विक्री करता येणार नाही, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

**ऑनलाइन पीक पेराची नोंद नसल्याने अडथळा**

अनेक कापूस उत्पादक शेतकऱ्यांना ऑनलाइन पीक पेरा नोंदविताच आला नाही. परिणामी त्यांची कापूस विक्रीसाठीची ऑनलाइन नोंदणी अडचणीत आली. आता काही ठिकाणी ऑफलाइन पद्धतीचा अवलंब केला जात असला, तरी त्या प्रक्रियेतही अनेक तांत्रिक व प्रशासकीय अडथळे आहेत. उर्वरित दिवसांत सर्व शेतकऱ्यांची नोंदणी होणार की नाही, याबाबत सांगणे कठीण आहे.

**किचकट प्रक्रियेने शेतकऱ्यांना हेलपाटे**

कापूस विक्रीसाठी सीसीआयचे अप्रूव्हल मिळविणे ही शेतकऱ्यांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. आधी बाजार समितीची मंजुरी, त्यानंतर सीसीआयचे ॲप्रूवल अशी दुहेरी प्रक्रिया असल्याने शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयांचे फेरे मारावे लागत आहेत. या किचकट प्रक्रियेमुळे शेतकरी वैतागले आहेत. ऑनलाइन नोंदणी आणि सीसीआयचे अप्रूव्हल मिळाल्यानंतरही कापूस विक्रीसाठी स्लॉट बुकिंग करणे बंधनकारक आहे. ही प्रक्रिया अधिकच गुंतागुंतीची असल्याचे शेतकरी सांगतात. त्यामुळे उर्वरित १३ दिवसांत किती शेतकरी ही सर्व प्रक्रिया पूर्ण करू शकतील, यावरच कापूस हमीचा शेतकऱ्यांना किती फायदा होईल हे दिसेल.

---------------

### साखरेच्या दरावर दबाव

मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या माहितीनुसार, चालू २०२५-२६ हंगामात साखर उत्पादनाबाबत मजबूत आणि आशादायी कल दिसून येत आहे. प्रमुख ऊस उत्पादक राज्यात ऊस मुबलक प्रमाणात उपलब्ध असणे आणि कार्यक्षमतेत झालेली सुधारणा ही यामागील कारणे आहेत. या वाढीतून क्षेत्राची उत्पादनक्षमता अधोरेखित होत असताना, साखरेच्या अतिरिक्त साठ्यामुळे दरावर परिणाम होईल, अशी चिंता साखर कारखानदारांनी व्यक्त केली आहे. त्यांनी साखरेच्या किमान विक्री दरात तत्काळ सुधारणा करण्याची मागणी केली आहे. सध्याचा साखरेचा दर उत्पादन खर्चाच्या तुलनेत पुरेसा नाही. त्यात अधिक ऊसदर, उर्जेवरील खर्च आणि कारखान्यांसाठी लागणाऱ्या संसाधनाचा समावेश होतो. त्याचबरोबर, साखरेच्या विक्री दरावर दबाव राहिला आहे. परिणामी कारखान्यांचा नफा कमी होत चालला आहे, असे कारखानदारांचे म्हणणे आहे. कारखान्यांवरील सततचा आर्थिक बोजा सहकारी साखर कारखान्यांसमोरील रोख प्रवाहाची समस्या आणखी तीव्र होऊ शकते. याचा थेट परिणाम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर ऊस बिलाचे पैसे देण्यावर होईल. तसेच ग्रामीण भागातील समस्या आणखी वाढतील, अशीही चिंता कारखानदारांनी व्यक्त केली आहे.

---------------

### माणिकराव कोकाटेंना

कोकाटे यांचा राजीनामा स्वीकारल्यानंतर अजित पवारा यांनी एक्सवर एक पोस्ट करून त्यावर आपली पहिली प्रतिक्रिया दिली आहे. ज्यामध्ये अजित पवार यांनी या प्रकरणातील आपली आणि पक्षाची भूमिका स्पष्ट केली आहे. माननीय न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील आमचे सहकारी माणिकराव कोकाटे यांनी आपला राजीनामा माझ्याकडे सुपूर्द केला आहे. कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला आहे. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मा. मुख्यमंत्री महोदयांकडे पाठवण्यात आला आहे, असे पवार म्हणाले.

---------------

### लोकसभेत प्रचंड गदारोळात

आहे. आपलेच म्हणणे रेटणे आणि दुसऱ्याचे न ऐकणे, हा देखील एक प्रकारचा हिंसाचारच आहे, असे ते म्हणाले. पत्रकार परिषदेत बोलताना केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, ग्रामीण विकास आणि रोजगारासाठी अनेक योजना सुरू करण्यात आल्या आहेत. सर्वसमावेशक ग्रामीण रोजगार योजना, त्यानंतर जवाहर रोजगार योजना, आणि त्यानंतर मनरेगा आली. जर त्यात पंडित जवाहरलाल नेहरूंचे नाव समाविष्ट केले नाही, तर याचा अर्थ त्यांचा अपमान झाला का.? विकसित भारतासाठी विकसित गावे हा पंतप्रधान मोदींचा संकल्प आहे आणि त्यासाठी पुरेसा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. काँग्रेसने मनरेगावर किती खर्च केला? असा सवाल करत आम्ही एक सर्वसमावेशक योजना तयार केली आहे. बेरोजगारी भत्त्याच्या तरतुदी मजबूत करण्यात आल्या आहेत. जर १५ दिवसांच्या आत मजुरी दिली नाही, तर विलंबित वेतन वितरणासाठी दररोज ०.०५% अतिरिक्त रक्कम द्यावी लागेल. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींकडे लक्ष देण्यात आले आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र गॅरंटी कार्ड जारी केले जातील आणि त्यांना कमी कामासाठीही जास्त मजुरी मिळेल. यात अडचण काय आहे हे मला समजत नाही?, असा सवालही त्यांनी विरोधी पक्षांना केला.

---------------

### मजुरांना घेऊन जाणाऱ्या टेम्पोचा

या दुर्घटनेत एकाच परिवारातील ५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. याच ठिकाणी आता हा भीषण अपघात झाल्याने स्कुटी चालकाचा मृत्यू झाला आहे. दरम्यान हा अपघात झाल्याचे कळताच परिसरातील शेतकऱ्यांनी आणि प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी आपली वाहने थांबवत तात्काळ जखमींना रुग्णालयात हलवण्यास मदत केली. राजूर आणि टेंभुर्णी पोलिसांनी सुद्धा घटनास्थळी धाव घेतली. रुग्णवाहिकांना कॉल करून तात्काळ जखमी मजुरांना जालना येथे घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. पुढील तपास टेंभुर्णी पोलीस करत आहेत.

-----------

### कोकाटेंचे झाले आता मंत्री

प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती नेमल्यामुळे मंत्री सिरसाट यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सरकारच्या परिपत्रकानुसार, प्रस्तुत समिती धनदा कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तेच्या लिलावामध्ये निविदा प्रक्रिया राबवताना त्यामधील अटी, शर्ती किंवा इतर प्रक्रियेत कुठे अनियमितता झाली आहे काय? याबाबत व सदर मालमत्तेच्या मूल्यांकनाबाबत सखोल चौकशी करणार आहे. सदर मालमत्तेच्या मूल्यांकनाबाबत सखोल चौकशी अहवाल समितीच्या शिफारशी व अभिप्रायांसह तसेच आवश्यक कागदपत्रांसह ८ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या पत्रकावर छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांची स्वाक्षरी आहे. यापुर्वी अजितदादांच्या राष्ट्रवादीचे धनंजय मुंडे याना राजीनामा द्यावा लागला होता त्यानंतर मंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा झाला आता शिवसेनेचे मंत्री संजय सिरसाट यांच्या मागे चौकशीचा ससेमिरा लागला असून, या चौकशीत ते अडचणीत येऊ शकतात.

**समितीत कुणाचा समावेश?**

छत्रपती संभाजीनगरच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वातील या समितीत संभाजीनगरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, सहसंचालक लेखा व कोषागारे, उपायुक्त कामगार विभाग, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सह जिल्हा निबंधक, सहाय्यक संचालक नगर रचना विभाग आदींचा सदस्य म्हणून समावेश आहे. या व्यतिरिक्त समिती अध्यक्षांना जे अधिकारी सदर समितीत आवश्यक वाटतील त्यांची नियुक्ती करण्याचे अधिकारही देण्यात आले आहेत.

**सरकार पांघरून घालतेय - दानवे**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी या समितीवरून सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ते म्हणाले, ज्या कार्यालयातून विट्स हॉटेल (धनदा कॉर्पोरेशन) गैरव्यव्हार प्रकरणाच्या फाईली फिरल्या, त्याच कार्यालयांचे अधिकारीच आता या प्रकरणाची चौकशी करणार असल्याचा आदेश निघाला आहे. ही कसली हाय पॉवर कमिटी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी हे तर प्रकरणावर स्पष्टपणे पांघरूण घालत असल्याचे दानवे म्हणाले.

---------------

### जामखेडमध्ये रोहित पवारवर

गोळी लागल्याने तो यात गंभीर जखमी झाला. यानंतर संशयितांनी हॉटेल मालकाच्या चारचाकी गाडीचीही तोडफोड केली. दरम्यान, या हल्ल्यात गाडीचे मोठे नुकसान झाले असून, संशयित हल्ला करुन पळून गेले. तर जखमीस तातडीने पुढील उपचारासाठी नगर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी दोन संशयितांची नावे निष्पन्न झाली आहेत. याशिवाय पोलिसांकडून सध्या आजुबाजुचे काही सीसीटीव्ही कॅमेरे तपासले जात आहेत.

---------------

### गेवराईत दिवसाढवळ्या

शास्त्री चौकाकडे जात होती. तेवढ्यात अल्टो गाडीतून आलेल्या तरूणांनी पायी जाणाऱ्या मुलीला बळजबरीने गाडीत बसविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी, मुलीने जोरदार प्रतिकार केला. मात्र, दोघांनी तिला मारहाण करून गाडीत टाकले. यावेही काही लोकांनी गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. गाडी शास्त्री चौकातून पुढे राष्ट्रीय महामार्गाच्या दिशेने शहागडकडे गेली. पोलिसांना हे समजताच सहायक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस अधिकारी कोटकर यांनी सदरील चारचाकी गाडीचा पाठलाग केला आणि तपासाची चक्रे वेगाने फिरली. अपहरण झालेली मुलगी परभणी शहरात पोलिसांना मिळाली असून, अवघ्या काही तासात गेवराईच्या बहाद्दर पोलीसांनी त्या मुलीचा शोध घेतला. ही यशस्वी कामगिरी पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक सहायक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश कोटकर, दीपक लंके, पोलीस उपनिरीक्षक निशिगंधा खुळे, पोलीस उपनिरीक्षक सुरेश पारधी, पोलीस कॉन्स्टेबल आरेफ बागवान यांनी व परभणी पोलिसांनी केली आहे. पोलीसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केले असून, आरोपी लवकरच जेरबंद करण्यात पोलीसांना यश मिळेल. अशी माहिती पोलीस अधिकारी संतोष जंजाळ यांनी दिली. पोलिस या घटनेचा तपास करीत असून, हा प्रकार नेमका काय आहे हे तपासातून समोर येणार आहे. दिवसाढवळ्या घडलेल्या घटनेचा थरार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

---------------

### हिवाळी अधिवेशनात

पवारावर तुटून पडतील असे वाटत होते. कारण पार्थ पवार यांनी जो जमीन घोटाळा केला तो साधा नव्हता तर जवळपास ८०० कोटी रुपयांचा हा घोटाळा होता. याशिवाय या जमिनी महार वतनातील होत्या. त्या कमी भावात खरेदी तर केल्याच शिवाय नियमाचा भंग देखील झालेला आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार अडचणीत येतील. पण अडचणीत येतील ते अजित पवार कसले. त्यांनी हे सर्व आरोप फेटाळून लावले. हे प्रकरण निवासस्थानापर्यंत गेले तेव्हा अजित पवारांनी ते घर माझे नाही, पार्थच्या नावावर आहे, असे सांगितले. असे असताना हिवाळी अधिवेशन गरमागरमीचे होणार, असे ज्यांना वाटत होते त्यांची मात्र निराशा झाली. संपूर्ण अधिवेशनात या प्रकरणावर कोणताही लोकप्रतिनिधी बोलला नाही. सत्ताधारी तर सोडाच पण विरोधकांनी सुद्धा शब्द काढला नाही. यावरून अजित दादांचा दरारा आणि आवाका कसा आहे हे दिसून आले. विधानसभेतील २८८ आणि विधान परिषदेतील ७८ असे ३६६ लोकप्रतिनिधी यावर बोलले नाहीत हेच मोठे आश्चर्य आहे. या प्रकरणात दुसरे कोणी असते तर अधिवेशनाचा संपूर्ण कालावधी त्याच विषयावर फिरत राहिला असता. पार्थ पवार यांचा जमीन घोटाळा तर सोडाच कोणत्याच विषयावर सभागृहात दखल घ्यावी अशी चर्चा आणि निर्णय झाले नाहीत. एरव्ही लहान - मोठ्या घटनेवर घसा फुटे पर्यंत आवाज उठवणारे विरोधकही का शांत झाले असावेत, याचे उत्तर म्हणजेच दादांचा दरारा असेच म्हणावे लागेल.

## थोडक्यात



करेवडगाव, तालुका आष्टी येथे सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ खाडे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यानंतर गुरुवारी त्यांची भेट घेऊन प्रकृतीची आस्थेने विचारपूस केली. यावेळी माजी आमदार भिमराव धोंडे, युवक प्रदेशाध्यक्ष महबूब भाई शेख, ज्येष्ठ नेते आन्नासाहेब चौधरी, तालुका अध्यक्ष सुनिल दादा नाथ, प्रदेश सचिव रिजवान भाई तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते. रामभाऊ खाडे लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावेत, अशी मन:पूर्वक सदिच्छा व्यक्त करत, या भ्याड व निंदनीय हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या घटनेतील दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली.

## निवृत्ती वेतन धारक यांचे आयकर कपातबाबत निवेदन

बीड । प्रतिनिधी

ज्या निवृत्ती वेतन धारकांना आयकर बसतो परंतु त्यांचा अर्ज बचतीसह या कार्यालयात विहीत मुदतीत प्राप्त होणार नाही, अशा निवृत्ती वेतन धारकाचा आयकर या कार्यालयात आयकर नियमावली नुसार कपात करण्यात येईल. त्या अनुषंगाने बचतीचे विवरण पत्र व नंबर सह या कार्यालयास दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सादर करावे,असे आवाहन कोषागार अधिकारी यांनी केले आहे.




## द्वारका अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीच्या दिनदर्शिकेचे विमोचन

माजलगाव । प्रतिनिधी

मैत्रीपूर्ण आणि विश्वास पात्र हमी या विचाराने स्थापन झालेल्या द्वारका अर्बन को ऑफ क्रेडिट सोसायटी या संस्थेच्या दिनदर्शिकेचे विमोचन १६डिसेंबर रोजी संस्थेच्या मुख्य कार्यालयात करण्यात आला. द्वारका अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी या दिनदर्शिकेचे हे ७ वे वर्ष असून बचतीची माहिती व विविध उपक्रम या दिनदर्शिकेच्या माध्यमातून नागरिकांपर्यत पोहोचविण्याचे काम केले जाते. दर वर्षी ५००० दिनदर्शिका नागरिकांना मोफत घरपोच दिल्या जातात. या दिनदर्शिकेत सर्व सण -उत्सव, जागतिक दिन, थोर महापुरुषांच्या जयंती-पुण्यतिथी, परिसरातील महत्वाचे संपर्क क्रमांक, परिसरातील नवउद्योजक-व्यावसायिक यांच्या जाहिराती अशी बहुउपयोगी दिनदर्शिका द्वारका अर्बन या संस्थेच्या वतीने दरवर्षी प्रसिद्ध करण्यात येते २०२६या वर्षीच्या दिनदर्शिकेच्या विमोचन प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दिगंबर माणिकराव सोळंके, खरेदी विक्री संघाचे संचालक महेश सोळंके, विकास एरंडे, कृष्णा सुकरे, पेंटर पंकज साळवे, सुनील उदावंत,अशोक सोळंके, संस्थेचे शाखा व्यवस्थापक सदाशिव सोळंके यांच्या सह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते होते.

# पाटोदा तहसील कार्यालयाचा सावळा गोंधळ

## लवकरच होणार भांडाफोड?

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तहसील कार्यालय सध्या गंभीर सावळ्या गोंधळाच्या चर्चेत सापडले आहे. कागदोपत्री सर्व काही सुरळीत असल्याचे चित्र दाखवले जात असले, तरी प्रत्यक्षात कारभारात घोळ, संशयास्पद हालचाली आणि दबक्या आवाजात सुरू असलेल्या चर्चांमुळे अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

सूत्रांकडून मिळालेल्या खात्रीजनक माहितीनुसार, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नेमलेल्या काही ठराविक कर्मचाऱ्यांकडून गेल्या सुमारे दहा वर्षांपासून गैरप्रकार सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. याबाबत पाटोदा तहसीलदारांकडून सखोल चौकशी होणार का, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

सामान्य नागरिकांची कामे महिनोन्?महिने प्रलंबित ठेवली जात असून, फाइल्सना धूळ खात पडावे लागत आहे. मात्र काही मोजक्या व्यक्तींची कामे अवघ्या काही तासांत किंवा दिवसांत मंजूर होत असल्याचे चित्र दिसत आहे. या दुहेरी भूमिकेमागे नेमके कोणते गणित आहे, आणि कुणाच्या आशीर्वादाने हे प्रकार सुरू आहेत, याची उघड चर्चा पाटोदा शहरात सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, काही धक्कादायक कागदपत्रे लवकरच बाहेर येण्याच्या मार्गावर असून, योग्य वेळी भांडाफोड झाल्यास अनेकांचे मुखवटे गळतील, अशी शक्यता वर्तवली जात आहे. वरवर शांत दिसणाऱ्या तहसील कार्यालयात आतून मात्र अस्वस्थतेचे वादळ घोंगावत असल्याचे चित्र आहे. उत्पन्न दाखले, ७/१२ उतारे, फेरफार नोंदी, विविध प्रमाणपत्रे व इतर शासकीय कामांसाठी प्रत्येक टप्प्यावर अधिकृत फीपेक्षा जादा रक्कम मागितली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रक्कम देण्यास नकार दिल्यास कामे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली जातात, असा संताप व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, ही वसुली थेट न करता दलाल, मध्यस्थ व कार्यालयातील काही हाताखालच्या कर्मचाऱ्यांमार्फत केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. वरवर नियमांचे पालन दाखवायचे आणि आतून मात्र खिसे भरायचे, असा ठरलेला पॅटर्न असल्याची चर्चा आहे.

## कर्मचाऱ्यांच्या वेशातील दलालांवर कारवाईची मागणी

पाटोदा तहसील कार्यालयात कर्मचारी म्हणून वावरणारे, पण प्रत्यक्षात दलालाची भूमिका बजावणारे काही चेहरे प्रशासनासाठी मोठी डोकेदुखी ठरत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. जनतेच्या सेवेसाठी नेमलेले कर्मचारीच जर वसुलीचे एजंट बनत असतील, तर सामान्य नागरिकांनी न्याय मागायचा कुठे, असा सवाल उपस्थित होत आहे. काम करून देतो, अशी हमी देत खिसे गरम करणारे, फाइल्स अडवून ठेवणारे आणि नियमांची पायमल्ली करणारे हे कर्मचारी नव्हे, तर संपूर्ण यंत्रणेलाच पोखरणारे दलाल असल्याचा आरोप होत आहे. अशा व्यक्तींना कार्यालयात ठेवणे म्हणजे भ्रष्टाचाराला मोकळे रान देण्यासारखे असल्याची तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# वडवणीचे ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांचा सन्मान

## मराठी पत्रकार परिषद व स्व.माणिकराव देशमुख प्रतिष्ठानचा उपक्रम

वडवणी । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत पुरस्कार वितरण व पत्रकारांचा गुणगौरव सोहळा दि.१४ डिसेंबर २०२५ रविवार रोजी संपन्न झाला. या सोहळ्यात मागील ४० वर्षांपासून वडवणी तालुक्यात प्रामाणिकपणे पत्रकारिता करणारे दै.झुंजार नेताचे ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करुन सत्कार करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने वडवणी तालुक्यातील देवडी येथील माणिक बागेत पुरस्कार वितरण व पत्रकारांचा गुणगौरव सोहळा दि.१४ डिसेंबर २०२५ रविवार रोजी मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाला पद्मभूषण हिवरे बाजारचे आदर्श सरपंच पोपटराव पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे आरोग्य कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, मराठी पत्रकार परिषदेचे मुंबई विभागाचे अध्यक्ष राजाभाऊ अदाटे, आरोग्य विभागाचे प्रमुख दिपक कैतके, मराठी



पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख, मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त शरद पाबळे, राज्याचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, कोषाध्यक्ष मन्सुरभाई शेख, सुनिल लोणकर, डिजीटल मिडीया राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्यासह सत्कारमूर्ती ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब, ज्येष्ठ पत्रकार सुभाष देशमुख, शेतीनिष्ठ शेतकरी गोरख झाटे, कल्याण कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. यावेळी पत्रकारांच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याचवेळी बीड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारांचाही सत्कार करण्यात आला. यामध्ये मागील ४० वर्षांपासून वडवणी तालुक्यासारख्या डोंगराळ व ग्रामीण भागात प्रामाणिकपणे पत्रकारिता करणारे दै.झुंजार नेताचे ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांचा वरील मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करुन त्यांच्या कार्याचा सन्मान व सत्कार करण्यात आला. या सन्मान सत्काराला उत्तर देतांना ज्येष्ठ पत्रकार सुभाषराव वाव्हळ म्हणाले की, मराठी पत्रकार परिषद व स्वातंत्र्यसैनिक माणिकराव देशमुख सामाजिक विकास प्रतिष्ठानच्या वतीने माझा केलेला हा सन्मान निश्चितपणे माझ्यासाठी ऊर्जादायी व प्रेरणादायी आहे. मी त्यांचा मनापासून आभारी आहे. ग्रामीण भागामध्ये पत्रकारितेचे काम करत असतांना मागील ४० वर्षांमध्ये विविध समस्यांचा व अडचणींचा सामना करावा लागला. परंतू मनामध्ये व रक्ताच्या प्रत्येक थेंबामध्ये निर्भीड व प्रामाणिक पत्रकारिता असल्याने इथपर्यंतचा टप्पा मी गाठू शकलो. यामध्ये माझ्या आयुष्याशी निगडीत प्रत्येक घटकांचा मोलाचा वाटा आहे. निश्चितपणे यापुढेही आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत पत्रकारितेलाच माझे जीवन समर्पित राहील असे भावनिक मनोगत त्यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी पत्रकार परिषद डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले. तर आभार प्रदर्शन मराठी पत्रकार परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके यांनी केले. यावेळी महाराष्ट्रभरातून अनेक ज्येष्ठ पत्रकार या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### तपोवन बचावासाठी

एकजीव'' या विचाराचा उल्लेख करत निवेदनात म्हटले आहे की, वृक्षतोड म्हणजे केवळ हरित संपत्तीचा ऱ्हास नव्हे, तर संस्कृती, भावविश्व, परंपरा, पर्यावरणीय संतुलन आणि भावी पिढ्यांच्या हक्कांवर आघात आहे. स्थानिक नागरिकांनी यापूर्वीच्या अनेक उदाहरणांचा संदर्भ देत सांगितले की, भव्य प्रकल्प उभारले गेले तरी त्याने वनक्षेत्र व जैवविविधता नष्ट झाल्याचे दुष्परिणाम भविष्यात तीव्र जाणवतात. तपोवनही त्याला अपवाद ठरणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे

''कुंभमेळ्यासाठी इतर पर्यायी जागांचा शोध घेणे, विस्तारीकरणासाठी वैज्ञानिक उपाय करणे आणि पर्यावरणपूरक नियोजन करणं सरकारलाच योग्य ठरेल. पण निसर्गाचा बळी देणे कधीही मान्य नाही.''शेवटी केलेले आवाहन प्रभावी होते

''वृक्षतोडीचा निर्णय तात्काळ मागे घ्या; निसर्गाचे रक्षण म्हणजेच मानवतेचा खरा सन्मान!''

माजलगावातील सर्व पर्यावरणप्रेमी तपोवन बचावाच्या लढ्यात नाशिककरांसोबत खंबीरपणे उभे असून, पुढील काळातही या आंदोलनाला सक्रीय पाठिंबा दिला जाईल, असा संदेश त्यांनी प्रशासनाला स्पष्टपणे दिला. याप्रसंगी जानवी जाधव,शोभा डाके,प्रभा गंगणे,सारिका बेद्रे,सुनंदा झाडे,जयश्री झाडे,मंगल काठूळे तसेच इरफान पठाण, अजय सावंत, डॉ. वरुणराज तौर हे उपस्थित होते.

### गेवराईच्या डॉक्टरला सहा

सहभागी आहे काय तसेच अजुन किती लोकांची फसवणुक करण्यात आली आहे याची सखोल चौकशी करण्यात येत आहे.

हि कारवाई पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस आधिकारी बीड यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे बीड चे पोनि निलेश केळे, सपोनि संदिप अराक, पोह विजय घोडके, पो.अं. अमोल दरेकर, पो. अं.निलेश उगलमुगले, पो. अं. श्रीक्रष्ण टेकाळे तसेच तांत्रिक विश्लेषन कक्ष येथील पो.उपनि शेखर औटे, अश्विनकुमार सुरवसे यांच्या पथकाने केली. बीड जिल्हा पोलीसांचे नागरीकांना आवाहन आहे की, डिजीटल अरेस्ट / गुन्हयात समावेश असल्याचे भिती दाखवुन पैस्याची मागणी करणा-या व्यक्ति/बनावट संस्था पोलीस ईत्यादीवर विश्वास ठेवु नये.

### गटविकास अधिकारी अनिरुद्ध

पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये बीड पंचायत समितीच्या दालनामध्ये रुदयपूर्वक सत्कार करण्यात आला.

यावेळी लिंबागणेश सर्कल मधील प्रलंबित असणाऱ्या अनेक फाईलबाबत तसेच गाय गोठ्यांच्या अनुदानात गुराप्रमाणे वाढ करणे, कुशल चे नवीन प्रणाली प्रमाणे ऑनलाइन करून थकी देयके देणे, रेशीमचे बीड तालुक्यात उद्दिष्ट वाढविणे, ग्रामीण भागातील घरकुलांच्या बाबतीत हप्ते वेळेवर सोडणे यासह ९० १० सिमेंट रोड खडीकरण आदीबाबत नूतन प्रभारी गटविकास अधिकारी श्री अनिरुद्ध सानप यांच्यासोबत गणेश उगले यांनी शिष्टमंडळासह सविस्तर चर्चा केली.

यावेळी लिंबागणेश ग्रामपंचायतचे सरपंच श्री बालासाहेब तात्या जाधव, गवळवाडी गावचे ग्रामपंचायत सदस्य तथा ज्येष्ठ नेते चेअरमन अनुरथ भाऊ मस्के, पत्रकार अशोक सुखवसे,लिंबागणेश सर्कल मधील नेते व लोकांच्या अडीअडचणीसाठी सतत पंचायत समितीमध्ये उपलब्ध असणारे शरद बडगे, सोमनाथ वाडीचे सरपंच किशोर शेळके, तहसील कार्यालयातील ग्रामीण भागातील लोकांचे कामे करणारे निलेश जगताप मुर्शदपुर, बेलगाव चे सरपंच श्रीमान जाधव, अर्जुनराव शेळके, रामा वायभट, दादासाहेब गायकवाड, ऋषी काळे उमरद जहांगीर हे उपस्थित होते.

### बीडमध्ये विजय काकडे

ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून घेण्यात आला. वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर लावल्यामुळे दूरवरूनच वाहन स्पष्ट दिसून येत असून इतर वाहनचालकांना वेळीच अंदाज येण्यास मदत होते. परिणामी अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होण्यास हातभार लागणार आहे. या कार्यक्रमाचे प्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी वाहन चालकांना वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करत वाहनांवर आवश्यक सुरक्षात्मक साधने वापरण्याचे महत्त्व विशद केले. तसेच यावेळी अनेक वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर बसविण्यात आले. या सामाजिक व उपयुक्त उपक्रमाबद्दल उपस्थित वाहनचालकांनी समाधान व्यक्त केले. प्रशासन व सामाजिक संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून असे उपक्रम सातत्याने राबविले गेल्यास रस्ते अपघातांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाप्रसंगी ट्रान्सपोर्ट धारक, वाहन मालक व चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय खेळातूनच विद्यार्थ्यांचा करिअर कल लक्षात येतो -लेखक राजेश दिवटे

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ऑनेस्टी पब्लिक स्कूल मध्ये दरवर्षी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी मिळावी या हेतूने वेगवेगळे कार्यक्रम नेहमीच घेतल्या जातात त्यापैकी क्रिडा सप्ताह चे उद्घाटन येथील स्वामी विवेकानंद स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे संस्थापक व प्रसिद्ध लेखक राजेश दिवटे यांच्या हस्ते करण्यात आले...यावेळी त्यांनी मार्गदर्शनात उद्याचा चांगला नागरिक होण्यासाठी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांचा करियर कल लक्षात येतो..असे प्रतिपादन केले. शाळेच्या प्रिन्सिपल गौरी तोर /कानडे यांनी प्रास्ताविक मध्ये वर्षभरातील कार्याचा आढावा मांडला त्यामधे मुलांना अभ्यासाबरोबर इतर सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेण्यास प्रोत्साहित केले जाते.




क्रिडा सप्ताह मध्ये सांघिक क्रिडा त्यामधे कबड्डी ,खोखो वैयक्तिक मध्ये धावणे, उंच,लांब उडी, मेमरी,फनी खेळ,बकेट इन बॉल इत्यादी खेळाचे आयोजन केलेले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनाली नाईकवाडे यांनी केले व पाहुण्यांचे आभार प्रदर्शन डॉ विठ्ठल वाघ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रिडाप्रमुख अश्विनी घुबडे ,सांस्कृतिक प्रमुख सुनीता वैरागे, वाईस प्रिन्सिपल जयश्री जाधव, स्कूल इनचार्ज सोनाली यादव संगणक प्रमुख राजश्री महामुनी, दीपा शिंदे, सरिता सोनवणे, वर्षा दीक्षित, सविता सोळंके, अश्विता टाक, लता गाडेकर यांनी सहकार्य केले.

# आनंद नगरीतून विद्यार्थ्यांना मिळाले व्यवहार ज्ञानाचे धडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

**विद्यार्थी दशेतच विद्यार्थ्यांमध्ये व्यवहार ज्ञान यावे, पैसे कमावण्यासाठी कसे परिश्रम घ्यावे लागतात याची जाणीव निर्माण व्हावी यासाठी दि.१७रोजी जिजामाता माध्यमिक विद्यालय मोगरा येथील शाळेत आज आनंदनगरी आयोजित करण्यात करण्यात आली .या कार्यक्रमाला मोगरा गावचे सरपंच- गिन्यानदेव राठोड, उपसरपंच-संदीप सावंत, माजी सरपंच-शामराव राठोड,उद्धव अप्पा धुमाळ, मच्छिंद्र इंगळे ,तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, विद्यार्थ्यांचे पालक,माजी विद्यार्थी उपस्थित होते.**

या कार्यक्रमात वर्ग पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थ स्वतः करून



शाळेत त्यांची विक्री केली. विविध पदार्थासाठी लागणारे साहित्य, त्याची पद्धती आपसापसातील समन्वय व्यवहारात होणारा नफा तोटा या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांनी यामधून शिकल्या. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक-गवळी सर, डाके सर, आव्हाड सर,झगडे सर ,राठोड सर , जाधव सर, साखरे सर तसेच लांडगे मॅडम व रोडे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या पदार्थांची चव चाखण्याचा सर्वांनी आस्वाद विद्यार्थी,गावकरी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी आदिंनी घेतला.

# मानवी जीवनात सामाजिक शास्त्राची भूमिका महत्त्वाची -प्राचार्य डॉ.सोंडगे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय सामाजिक शास्त्र विभागाच्या वतीने सामाजिक शास्त्र मंडळाची उद्घाटन संपन्न झाली या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ सदाशिव सरकटे तर उद्घाटक म्हणून प्राचार्य डॉ तात्याराम सोंडगे महिला महाविद्यालय गेवराई व प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ विश्वास कदम हे व्यासपीठावर उपस्थित होते सर्व प्राथमिक विभागाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला प्राचार्य सोंडगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना मानवी जीवनाच्या इतिहासात सामाजिक शास्त्रातील तत्त्वज्ञानामुळे मानवाची



जडणघडण अत्यंत परिवर्तनीय झाली आहे सामाजिक शास्त्रात जे लेखन संशोधन केले जाते यामुळे मानवी जीवनात सामाजिक शास्त्राची भूमिका अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मनोगत त्यांनी व्यक्त केले तर प्राचार्य डॉ विश्वास कदम यांनी इतिहास समाजशास्त्र राज्यशास्त्र यांच्या माध्यमातून मानवी जीवनाला आकार देण्याचा काम सामाजिक शास्त्र राज्या माध्यमातून केले जाते असे मनोगत व्यक्त केले अध्यक्ष समारोप प्राचार्य डॉक्टर सदाशिव सरकटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सामाजिक शास्त्राच्या माध्यमातून अलीकडच्या काळात अत्यंत महत्त्वाचे अशी संशोधन होत असून मानवी जीवनावर त्याचा परिणाम दिसून येत आहे मानवाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचे काम सामाजिक शास्त्र करतात असे मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक लोकप्रशासन विभाग प्रमुख प्राध्यापक सौ कल्पना घारगे यांनी केले या कार्यक्रमासाठी समाजशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ सुनील जाधव इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापक सोमनाथ घाडगे अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक शिवाजीराव काकडे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ लोखंडे भूगोल विभाग प्रमुख प्राध्यापक बजरंग दिसले शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्राध्यापक प्रवीण शिलेदार यांनी सहकार्य केले या कार्यक्रमाचे आभार समाजशास्त्री विभाग प्रमुख डॉ जाधव यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा डॉ लोखंडे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक शास्त्रातील विद्यार्थी विद्यार्थिनी व प्राध्यापक नारायण फुन्ने प्रा पापाजी चव्हाण यांनी सहकार्य केले दत्ता चादर शहाजी लवूळ यांनी परिश्रम घेतले.


### जाहीर प्रगटन

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान / श्रीमती काकासाहेब मधुकर मुळे रा. हरतखेडा ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या स्वतः च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबंधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

नाव ओवी काकासाहेब मुळे, अर्जदाराशी नाते मुलगी, जन्म दिनांक १५/०६/२०२४

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे,

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत था कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबंधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक-१७/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

cmyk

राज्य लोकतंत्र

शेत-शिवार

शुक्रवार दि.१९ डिसेंबर २०२५



# अर्थसहाय्यातून होणार शेतकऱ्यांची अर्थसमृद्धी!

## फळबाग लागवडीसाठी पात्र लाभार्थ्यांना कर्जाचे वितरण

सिरसाळा। प्रतिनिधी


मराठवाडा हा विभाग कायम दुष्काळी म्हणून गणल्या जातो. इथे कधी दुष्काळ पडतो तर कधी इथे अतिवृष्टी होते. नैसर्गिक आपत्तींशी सामना करणारा शेतकरी कायम आर्थिक संकटाच्या गर्तेत सापडलेला असतो. पारंपारिक शेतीतून मिळणारे उत्पन्न अतिशय तुटपुंजे असल्याने त्यांच्या दैनंदिन जीवनातील गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. अशा परिस्थितीत शेतकरी शाश्वत शेतीतील नाविन्यपूर्ण बदल कसे स्वीकारणार? हा प्रमुख प्रश्न त्यांना भेडसावतो. यावर जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून ग्लोबल विकास ट्रस्टने प्रभावी उपाय योजला असून फळबाग लागवड करण्यास इच्छुक असलेल्या गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना स्मॉल फायनान्स बँकेच्या सहकार्यातून आर्थिक सहाय्य केले जात आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मांडवा पठाण येथील १३ पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना थेट गावात जाऊन आर्थिक सहाय्याचे वितरण करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. बुधवार, दि.१७ डिसेंबर रोजी गावातील हनुमान मंदिर येथे सदरील उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. फळबाग लागवड करून हजारो शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावलेले असून त्यांच्या आर्थिक स्थितीत अमूलाग्र बदल झालेले आहेत. यापुढे ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमांतून गावगावात शेतीचा शाश्वत विकास घडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून त्या संपूर्ण गावांचा कायापालट करण्याचा आपला संकल्प असल्याचे जलनायक मयंक गांधी यांनी म्हटले आहे. पठाण मांडवा येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.



ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था जलनायक मयंक गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे हा संस्थेचा प्रमुख उद्देश असून, शेतकऱ्यांना लागणारे मार्गदर्शन आणि तांत्रिक सहाय्य संस्थेकडून मोफत उपलब्ध करून देण्यात येते. चार हजार गावांतील जवळपास तीस हजार शेतकरी संस्थेसोबत जोडले गेलेले आहेत. टाटा सामाजिक संस्थेने केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार ग्लोबल विकास ट्रस्टसोबत जोडल्या गेलेल्या शेतकऱ्यांचे उत्पन्न दहा पटीने वाढल्याचे दिसून आलेले आहे. कापूस, सोयाबीन आणि तत्सम पिकांच्या आधारावर शेतकरी जगूच शकत नाही. शेतीची पारंपरिक पद्धती बदलून आधुनिक शेतीच्या सहाय्याने आर्थिक उत्पन्नात वाढ होऊ शकते, मात्र त्यासाठीही सुरुवातीला पैशांची अडचण येते. आर्थिक संकटातील शेतकऱ्यांसाठी पैशांशिवाय हा नवा बदल करणे अशक्य असल्याची बाब लक्षात घेता ग्लोबल विकास ट्रस्ट आणि स्मॉल फायनान्स बँकेच्या संयुक्त विद्यमाने गरजू पात्र शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे. अंबाजोगाई तालुक्यातील मांडवा पठाण गावातून या उपक्रमाचा बुधवारी शुभारंभ करण्यात आला. पठाण मांडवा गावातील एकूण ६८ शेतकऱ्यांनी आवेदन केले होते त्यापैकी आज पहिल्या दिवशी १३ पात्र शेतकऱ्यांना नव्याने फळबाग लागवडीसाठी प्रति शेतकरी एकरी १ लाख २० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात आले. बँकेचे विभागीय अधिकारी दिलीप जीवने, स्वप्निल राडीकर, नागनाथ मुंडे, संदीप बाबर, केशव गव्हाणे, विशाल राठोड आदींनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी मदत केली.

शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवून आणणे हेच आपले एकमेव ध्येय आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांमध्ये बदलाची तीव्र भावना दिसून येत असून पारंपारिक शेतीला कंटाळलेले शेतकरी आधुनिक शेतीकडे मोठ्या प्रमाणावर वळू लागले आहेत. नव्याने फळबाग लागवड करण्याची इच्छा असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक अडचण असल्याचे कारण मागील काळात अनेक शेतकऱ्यांनी बोलून दाखवले होते. यावर आम्ही प्रभावी तोडगा शोधला आहे. कुठलीही बँक बिड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्ज तयार नव्हती. आम्ही स्मॉल फायनान्स बँकेला शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याची विनंती केली. परतफेडीबाबत त्यांना खात्री दिली, यापूर्वीही हा प्रयोग यशस्वी झाल्याचे उदाहरण त्यांच्यासमोर मांडले असता ते तयार झाले असून याचा जवळपास १ हजार शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याचे ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी सांगितले.

# माळवी गाय सर्वबाजुने ठरतेय फायदेशीर



माळवी ही भारतातील सर्वाधिक दूध देणाऱ्या गायींच्या जातींपैकी एक आहे. या गायीचे मूळ मध्य प्रदेशातील माळवा पठारी प्रदेशातील असल्याचे मानले जाते.

या गायीला महादेवपुरी आणि मंथनी या नावांनीही ओळखले जाते. दिसायला ही गाय इतर गायींपेक्षा सुंदर, मोठी आणि सुडौल आहे.

माळवी गाय देते एवढे दूध :माळवी जातीची गाय दररोज १२ ते १५ लिटर दूध देते. जे इतर गायींच्या तुलनेत दीडपट आहे. एवढेच नाही तर माळवी गाईच्या दुधात फॅटचे प्रमाणही इतर गायींच्या तुलनेत जास्त आढळते. माळवी गाईच्या दुधात ४.५ टक्क्यांहून अधिक फॅट आढळते. या जातीची गाय २० ते ५० हजार रुपयांना मिळते.

माळवी गाय इथे आढळते :पश्चिम मध्य प्रदेशातील माळवा पठार व्यतिरिक्त इंदूर, उज्जैन, रतलाम, देवास, शाजापूर इत्यादी जिल्ह्यांत या गायी आढळतात. हैदराबादमध्येही त्याचे संगोपन केले जाते. वक्र रचनेमुळे मालवी जातीच्या बैलांचाही भार वाहून नेण्यासाठी आणि शेतीसाठी वापर केला जातो. ही जात कांकरेज गायीच्या जातीशी मिळतेजुळते आहे.

या जातीची वैशिष्ट्ये :या गायी साधारणपणे पांढऱ्या, तपकिरी किंवा पांढऱ्या-तपकिरी रंगाच्या असतात.मान, खांदे, कुबड्याचा रंग तपकिरी-काळा असतो. डोळ्यांभोवतीचे केस काळे असतात. लहान डोके, रुंद थूथन जे किंचित वरचे आहे. पाय लहान पण मजबूत आहेत. त्यांचे खुर काळे आणि मजबूत असतात.

शिंगे मोठी असतात आणि बाहेरच्या बाजूने बाहेर येतात. लहान कान, मध्यम शेपटी, सरळ पाठ ही देखील या जातीची वैशिष्ट्ये आहेत. माळवी गाईचे सरासरी वजन ३५० किलो पर्यंत असते. ही गुरे खडबडीत रस्त्यांवर जास्त ओझे वाहून नेण्यास सक्षम आहेत.

# शेततळे योजनेत निवड झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यावर लवकरच पैसे

पुणे : मुख्यमंत्री कृषी शाश्वत सिंचन योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शेततळ्यांसाठी १०० कोटींपैकी केवळ १५ कोटींचा निधी देण्यास कृषी विभागाने मान्यता दिली. राज्यात प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर सुमारे ४६ लाख ५८ हजार ३२० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे यातून किती शेतकऱ्यांना या अनुदानाचा लाभ मिळेल, असा प्रश्न शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.

राज्यातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने अवर्षणग्रस्त, आत्महत्याग्रस्त व नक्षलग्रस्त जिल्ह्यांत ऑगस्ट २०१९ पासून सिंचन योजना राबविण्यात येत होती. ही योजना नोव्हेंबर २०२१ पासून राज्यातील उर्वरित भागातही राबविण्यात येत आहे. यामध्ये सूक्ष्म सिंचन अनुदानासोबतच वैयक्तिक शेततळे, अस्तरीकरण, हरितगृह उभारणी, शेडनेट उभारणी या घटकांसाठीही अनुदान देण्यात येते. राज्य सरकारने २०२५-२६ मध्ये या योजनेअंतर्गत सूक्ष्म सिंचन पूरक अनुदान घटकासाठी ४०० कोटी आणि वैयक्तिक शेततळे घटकासाठी १०० कोटी रुपयांना मान्यता देण्यात आली. मात्र, शेततळे अनुदानातील एक रुपयाही वितरित करण्यात आला नव्हता. याबाबत नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न विचारण्यात आला होता. त्यानंतर राज्य सरकारने तातडीने १५ कोटींचा निधी वितरणाचे आदेश दिले आहेत. हा निधी शेततळे योजनेत ज्यांची निवड झाली त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येणार आहे. राज्यात शेततळे योजनेंतर्गत आतापर्यंत ४६ लाख ५६ हजार ३२० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड करताना प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात आली आहे.

पूर्वी ही निवड लॉटरी पद्धतीने केली जात. त्यात अनेक पात्र शेतकऱ्यांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर बदल करण्यात आला. यंदापासून ही नवीन पद्धत लागू करण्यात आली. मात्र, सरकारने या अनुदानापोटी निधी वितरणच न केल्याने अनुदानापासून वंचित राहावे लागत होते. सरकारने शेततळ्यांसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा केली होती. प्रत्यक्षात आता निधी देताना केवळ १५ टक्केच वितरित केला आहे. त्यामुळे या मंजूर निधीतून किती शेतकऱ्यांना अनुदान मिळेल याची स्पष्टता अजून नसल्याचे समोर येत आहे.



# गाजर गवतापासून बनवा उत्तम सेंद्रिय खत

गाजर गवत पावसाळ्यात स्वतःच उगवते, पण त्याचा वापर न झाल्यामुळे शेतकरी तो कापून शेताबाहेर फेकतात किंवा रासायनिक पद्धतींनी नष्ट करतात.परंतु आता या गाजर गवताचा एक अनोखा वापर शास्त्रज्ञांनी शोधला आहे, जेणेकरून आता गाजर गवताचा वापर शेतीसाठी विशेष कंपोस्ट खत तयार करण्यासाठी केला जाईल. यामुळे एका बाजूला गाजर गवताचा वापर होईल आणि दुसरीकडे शेतकऱ्यांना नैसर्गिक आणि स्वस्त खते उपलब्ध होतील. पर्यावरण समिती उदयपूर आणि फॉस्टर इंडियन एनवायरनमेंट सोसायटी इंटली यांच्या संयुक्त तत्वाखाली गाजर गवतपासून विशिष्ट कंपोस्ट खत उत्पादन तंत्रज्ञानाचा शोध लागला आहे.नॅशनल इनोव्हेशन डिस्कव्हरी प्रोग्राम अंतर्गत शोधनिबंधात गाजर गवत सोडवून एक विशेष कंपोस्ट खत बनवले. यासाठी त्यांना दोन वर्षांचा कालावधी लागला. या तंत्राने बनवलेल्या खतामध्ये नायट्रोजन, स्फुरद, पोटॅशियमचे प्रमाण सामान्य हिरव्या खतापेक्षा तीनपट अधिक मोजले गेले, जे शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. संशोधनामुळे गाजर गवत निर्मूलनाच्या स्वरूपात दोघांनाही फायदा होईल आणि शेतकऱ्यांना त्यातून सेंद्रिय खत मिळेल. शेतकरी गाजर गवत (पार्थेनियम) पिकासाठी खत म्हणून वापरू शकतात, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षण होईल.



गाजर गवतपासून खत :या तंत्रात शेण, कोरडे पाने, पिकाचे अवशेष, राख, लाकूड भूसा इत्यादी कचरा सेंद्रिय पदार्थाचा एक भाग आणि गाजर गवतचे चार भाग या प्रमाणात बनवलेल्या एका लाकडी खोक्यामध्ये मिसळले जातात. या बॉक्सच्या भोवती छिद्र बनवले जातात, जेणेकरून हवेचा प्रवाह योग्य राहील आणि गाजर गवत लवकर खतामध्ये विघटित होऊ शकेल. यामध्ये रॉक फॉस्फेट आणि ट्रायकोडर्मा बुरशीचा वापर करून कंपोस्टमधील पोषक घटकांचे प्रमाण वाढवता येते. अशाप्रकारे, गाजर गवतपासून केवळ २ महिन्यांत सतत पाणी शिंपडून आणि ठराविक अंतराने हे मिश्रण उलथून हवा प्रदान करून सेंद्रिय खत तयार केले जाऊ शकते.

खतामध्ये पोषक घटकांचे प्रमाण जास्त : संशोधनानुसार गाजर गवतपासून बनवलेल्या कंपोस्टमध्ये मुख्य पोषकद्रव्ये शेण आणि गांडुळाच्या खतापेक्षा दुप्पट असतात. अशा परिस्थितीत गाजर गवत खत एक चांगला पर्याय बनू शकतो. नायट्रोजन १.०५, फॉस्फरस १०.८४, पोटॅशियम १.११, कॅल्शियम ०.९० आणि मॅग्नेशियम ०.५५ टक्के गाजर गवत आढळतात.गांडुळ खतात नायट्रोजन १.०५, फॉस्फोरस १०.८४, पोटेशियम १.११, कॅल्शियम ०.९० तसेच मॅग्नेशियम ०.५५ टक्के आढळते. अशाप्रकारे, गाजर गवतमध्ये पोषक तत्वांचे प्रमाण जास्त आहे. गाजर गवतचे फायदे :गाजर गवताचे कंपोस्ट हे एक सेंद्रिय खत आहे, ज्याचा वापर पिके, मानव आणि प्राण्यांवर कोणताही परिणाम करत नाही. गाजर कंपोस्ट एक संतुलित कंपोस्ट आहे ज्यात नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅश घटकांचे प्रमाण शेणखतपेक्षा जास्त असते. कंपोस्ट बनवताना, गाजरच्या जिवंत अवस्थेत आढळणारे विषारी रासायनिक पार्थेनिन पूर्णपणे विघटित होते. त्यामुळे ते पिकांसाठी पूर्णपणे सुरक्षित आहे. या मुख्य पोषक व्यतिरिक्त गाजर कंपोस्टमध्ये सूक्ष्म पोषक घटक देखील असतात जे पिकाच्या चांगल्या उत्पादनासाठी उपयुक्त असतात.

## दिन विशेष

### जागतिक दिवस: गोवा मुक्ती दिवस.

### महत्वाच्या घटना

१९१९ : अमेरिकेमध्ये हवामान संस्थेची स्थापना करण्यात आली.

१९२४ : जर्मनी चा सिरीयल किलर फ्रिट्ज हार्मेन याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावली गेली.

१९२७ : राम प्रसाद बिस्मिल, रोशन सिंग आणि अश्फाकुल्लाह खान या क्रांतिकारकांना ब्रिटिश सरकारने फाशी दिले.

१९४१ : दुसरे महायुद्ध ॲडॉल्फ हिटलर हा जर्मन सैन्याचा सरसेनापती बनला.

११५४ : दुसरा राजा हेन्री यांचे इंग्लंड चे राजे म्हणून राज्याभिषेक झाला.

१९६१ : भारतीय सैन्याने ऑपरेशन विजय च्या माध्यमाने गोव्याच्या बोर्डर मध्ये प्रवेश केला होता.

१९६१ : पोर्तुगिजांच्या ताब्यात असलेले दमण व दीव हे प्रांत भारतात समाविष्ट करण्यात आले.

१९६३ : झांजिबारला (युनायटेड किंगडमकडून) स्वातंत्र्य मिळाले आणि तेथे सुलतान जमशिद बिन अब्दूल्लाह यांची राजसत्ता अस्तित्त्वात आली.

१९८३ : ब्राझिलमधील रिओ डी जानिरो येथुन 'फिफा वर्ल्ड कप' चोरीस गेला.

१९९८ : अमेरिकेच्या डेनवर मध्ये विश्व विकलांग स्कीइंग मध्ये शील कुमार यांना सर्वोत्तम खेळाडू म्हणून पुरस्कार वितरीत.

२००२ : व्ही. एन. खरे यांनी भारताचे ३३ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.

२००६ : शैलजा आचार्य ह्या भारतासाठी नेपाळ च्या पहिल्या राजदूत बनल्या होत्या.

२००७ : ब्लादीमर पुतीन यांना टाईम्स मग्झीन ने पर्सन ऑफ़ द ईयर ने पुरस्कृत केले.

२०१२ : ज्यून-हाय पार्क ह्या दक्षिण कोरिया च्या पहिल्या महिला राष्ट्रपती बनल्या.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५२ : अल्बर्ट मायकेलसन - वर्णपटाद्वारे प्रकाशाच्या मापनासंबंधीच्या शोधासाठी नोबेल पारितोषिक (१९०७) मिळवणारे जर्मन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: ९ मे १९३१)

१८९४ : कस्तुरभाई लालभाई - दानशूर व राष्ट्रवादी विचारसरणीचे उद्योगपती, पद्मभूषण (१९६९), रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक (१९३७ १९४९). अरविंद मिल्स, अशोक मिल्स, अतुल असे अनेक गिरण्या व कारखाने त्यांनी चालू केले. आपल्या गिरण्यांत त्यांनी कामगार कल्याणासाठी सहकार संस्था काढल्या. (मृत्यू: २० जानेवारी १९८०)

१८९७ : अमेरिकेचे मुख्य धर्मोपदेशक मार्टिन लूथर किंग सीनियर यांचा जन्म.

१८९९ : मार्टिन ल्यूथर किंग - मानवाधिकारांसाठी आजीवन संघर्ष करणारे नेते (मृत्यू: ११ नोव्हेंबर १९८४)

१९०६ : लिओनिद ब्रेझनेव्ह - रशियातील कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस (मृत्यू: १० नोव्हेंबर १९८२)

१९१९ : ओमप्रकाश बक्षी ऊर्फ 'ओमप्रकाश' - चरित्र अभिनेते (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९१९)

१९३४ : प्रतिभा पाटील - भारताच्या १२ व्या आणि पहिल्या महिला राष्ट्रपती.

१९६६ : भारतीय क्रिकेटपटू राजेश चौहान यांचा जन्म.

१९६९ : भारतीय क्रिकेटपटू नयन मोंगिया यांचा जन्म.

१९७४ : रिकी पॉन्टिंग - ऑस्ट्रेलियन क्रिकेट कर्णधार व फलंदाज.

१९८४ : भारतीय चित्रपट अभिनेत्री अंकिता लोखंडे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८४८ : एमिली ब्राँट - इंग्लिश लेखिका (जन्म: ३० जुलै १८१८)

१८६० : लॉर्ड जेम्स ॲन्ड्र्यू ब्राउन रॅमसे - डलहौसी भारताचा गव्हर्नर जनरल (१८४८-१८५६), त्यांनी सार्वजनिक बांधकाम खाते स्थापन करुन सुमारे ३,४०० किमी लांबीचे रस्ते केले. टपाल व तार यांची सेवा सुरू केली. मुंबई ते ठाणे हा लोहमार्ग त्यांच्याच कारकीर्दीत सुरू झाला. (जन्म: २२ एप्रिल १८१२)

१९१५ : अलॉइस अल्झायमर - जर्मन मेंदुविकारतज्ञ (जन्म: १४ जून १८६४)

१९२७ : राम प्रसाद बिस्मिल - क्रांतिकारक (जन्म: ११ जून १८९७)

१९२७ : क्रांतिकारक अश्फाकुला खान यांचे निधन. (जन्म: १९००)

१९८८ : ज्ञानपीठ पुरस्कार पुरस्कार विजेते गुजराती साहित्यकार उमाशंकर जोशी यांचे निधन.

१९९७ : सोनीचे सहसंस्थापक मासारू इबकू यांचे निधन. (जन्म: ११ एप्रिल १९०८)

१९९७ : डॉ. सुरेन्द्र बारलिंगे - स्वातंत्र्यसैनिक, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष (जन्म: २० जुलै १९१९)

१९९८ : जनार्दन विठ्ठल तथा जे. एल. रानडे - भावगीतगायक

१९९९ : हेमचंद्र तुकाराम तथा बाळ दाणी - रणजी व कसोटी क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (जन्म: २४ मे १९३३).

cmyk

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

## थोडक्यात



### अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बच्या धमकीची अफवा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाला आज सकाळी ईमेलद्वारे बॉम्बस्फोटाची धमकी देण्यात आली होती. मात्र, पोलीस प्रशासनाने केलेल्या सखोल तपासणीत काहीही आक्षेपार्ह आढळले नसल्याने ही केवळ अफवा असल्याचे स्पष्ट झाले असून जिल्हाधिकारी कार्यालयाचे कामकाज आता पूर्णपणे सुरळीत सुरू झाले आहे. आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयास धमकीचा ईमेल प्राप्त होताच प्रशासनाने तातडीने पोलीस विभागाला याची माहिती दिली. खबरदारीचा उपाय व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलिसांनी संपूर्ण कार्यालय परिसर रिकामा केला. बॉम्ब शोधक पथकातील 'लुसी' व 'जंजीर' या श्वानांच्या मदतीने तसेच अत्याधुनिक बॉम्ब शोधक यंत्रणेद्वारे कार्यालयाच्या सहा मजली इमारतीची तपासणी करण्यात आली. यामध्ये सर्व मजले, जिने, लिफ्ट, पार्किंग व संपूर्ण परिसराचा समावेश होता. या शोधमोहिमेत अग्निशमन दल व एसआयडी पथकाचेही सहकार्य लाभले. या सखोल शोधमोहिमेत कोणत्याही प्रकारची संशयास्पद वस्तू अथवा स्फोटके आढळून आली नाहीत. परिसराची सुरक्षितता सुनिश्चित केल्यानंतर दुपारी कार्यालयाचे दैनंदिन कामकाज पुन्हा पूर्ववत सुरू करण्यात आले. राज्यात अनेक ठिकाणी एकाच वेळी अशा प्रकारचे धमकीचे ई-मेल आल्याने पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. हा प्रकार केवळ खोडसाळपणा असल्याचे प्राथमिक तपासात दिसून येत असून, अशा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस सायबर सेलच्या माध्यमातून करत आहेत.

### अहिल्यानगरमध्ये पोस्ट ऑफिसमध्ये राडा; कर्मचाऱ्यांना मारहाण

अहिल्यानगर। प्रतिनिधी

अहिल्यानगर येथील जीपीओ पोस्ट ऑफिसमध्ये शासकीय कामकाज सुरू असताना एका युवकाने गोंधळ घालून कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन केले. आरोपीने वरिष्ठ कर्मचाऱ्याला मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रॉबीन अजित महाडकर (रा. ख्रिश्चन कॉलनी, तारकपुर) असे आरोपीचे नाव आहे. सदरची घटना १६ डिसेंबर २०२५ रोजी पोस्ट ऑफिसमध्ये घडली. आरोपीने आरडाओरडा करत कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली आणि कामात व्यत्यय निर्माण केला. फिर्यादी आसीफ शेख (वय ५७, रा. मुकुंदनगर), जे पोस्ट ऑफिसमध्ये काम करतात, यांनी रॉबीनला समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु रॉबीनने आसीफ शेख यांना मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. मारहाणीमुळे शेख यांना दुखापत झाली असून, त्यांनी जिल्हा रुग्णलयात उपचार घेतले. त्यानंतर त्यांनी तक्रार नोंदवली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात रॉबीन महाडकर याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/६६४
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १०/११/२०२५

नाव बदलण्याचा
**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) दत्ता नारायण बडांगे सर्व्हे नं.-४५४/१ सिटी सर्व्हे नं. ३०९० सहन प्लॉट नं. २७ नं.प.मि.नं.१८-१७०-८ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. (१८-१७०-८) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम : प्लॉट नं. ३८
दक्षिण- कैलास माकोडे यांचा प्लॉट नंबर २८
उत्तरः वैशाली किरण भादले यांचा प्लॉट नं २६

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

## तहसिल कार्यालय

**माजलगांव बायपास रोड, माजलगांव ता. माजलगांव, जि. बीड ४३११३१**
**(दंड विभाग- जन्म / मृत्यू नोंदणी)**
**दु. ०२४४३-२९५०५२**
ईमेल: tahsildarmajalgaon@gmail.com

जा.क्र.२०२५/दंड विभाग/मृत्यू नोंद/का वि. दि. ११.१२.२०२५

**जाहीरनामा**

मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणेकरिता आदेश मिळणेबाबत जन्म-मृत्यु नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ (२) व (३) अन्वये

सर्व जनतेस याद्वारे जाहीर केले जाते की, संदर्भ क्र. (४) येथील अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करुन असे कळविले आहे की, त्यांचे कुटूंबातील व्यक्तींची मृत्यू तारीख व मृत्यू ठिकाण खालीलप्रमाणे आहे.

| अक्र (१) | व्यक्तीचे नांव (२) | अर्जदाराशी असलेले नाते (३) | मृत्यू तारीख (४) | मृत्यू ठिकाण (५) |
|---|---|---|---|---|
| १. | पार्थ सतीष कदम | मुलगा | १९.०४.२०२४ | कोथरुळ |

उक्त स्तंभ क्र. (३) मध्ये नमुद व्यक्तीच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत अधिकारी तथा निबंधक, मृत्यू नोंदणी, ग्रामपंचायत कार्यालय कोथरुळ ता. माजलगांव जि. बीड यांचे नोंदवहीमध्ये घेऊन त्याबाबत प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्जदार यांनी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता उक्त नमुद व्यक्तीची मृत्यू तारीख व मृत्यू ठिकाण कायदेशीर नाही, असे कोणास या कार्यालयाचे निदर्शनास आणून द्यावयाचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून १५ दिवसांचे आत त्याने / तिने या कार्यालयात हजर राहुन / अर्ज सादर करुन आपल्या हरकती कळवाव्यात. तसेच सर्व जनतेस हेही कळविण्यात येते की, जर विहीत मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखल केल्यास अर्जदार यांच्या हक्काबदल पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास उक्त नमुद मृत्यू तारीख व मृत्यू ठिकाण याबाबत नोंद कायदेशीर असल्याबाबत शासन नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार माजलगाव**

# आशा वर्कर यांच्याकडून एक हजाराची लाच घेताना दोघांना पकडले

जालना। प्रतिनिधी

आशावर्कर यांच्याकडून लाच घेतानी कालिंदा राजकुमार बनसोडे, तालुका समूह संघटक, तालुका आरोग्य कार्यालय घनसावंगी, रा कुंभार पिपळगाव, सविता पांडुरंग म्हस्के, आशा वर्कर, घनसावंगी, यांना रंगेहाथ पकडण्यात आले. सदरील घटना दि.१७.१२.२०२५ रोजी १५.४५ वा. सुमारास सविता पांडुरंग म्हस्के, आशा वर्कर, घनसावंगी यांचे राहते घरी, घटना घडली . यातील तक्रारदार हे आशा वर्कर असून त्याचे ऑक्टोबर महिन्याचे जमा झालेले मानधन त्यांच्या खात्यात जमा झाले, त्याचा मोबदला म्हणून यातील आरोपी यांनी सहा महिन्याचे दोन हजार रु मागितले होते. परंतु तक्रारदार यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने

त्यांनी दिनांक १६/१२/२०२५ रोजी ला. प्र. वि. कार्यालय जालना येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली होती. सदर तक्रारीवरुन दिनांक १७.१२.२०२५ रोजी इलोसे क्रमांक ०१ कालिंदा राजकुमार बनसोडे पद तालुका समूह संघटक यांची. तालुका आरोग्य कार्यालय, घनसावंगी येथे पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे सहा महिन्यांचे जमा झालेल्या मानधनाचा मोबदला म्हणून २ हजार रूपयांची लाचेची मागणी करून तडजोड अंती सहा महिन्यासाठी एक हजार रूपये स्वीकारण्याची सहमती दर्शवली. व आशा वर्कर श्रीमती सविता पांडुरंग म्हस्के रा घनसावंगी यांच्याकडे देण्याचे कळविले. आलोसे क्र १ कालिंदा बनसोडे तालुका समूह संघटक यांच्या सांगण्यावरून १५.४५ वा. च्या सुमारास इलोसे सविता पांडुरंग मस्केवय ४१ वर्ष, आशा वर्कर, तालुका घनसावंगी, जालना यांची त्यांच्या राहत्या घरी, माळी गल्ली, घनसावंगी, जालना येथे पंचासमक्ष सापळा कारवाई आजमावली असता आलोसे क्रमांक २ सविता म्हस्के यांनी लाचेची रक्कम १ हजार रुपये स्वीकारली असता त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पोलीस निरीक्षक, कोमल शिंदे यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले व १) कालिंदा राजकुमार बनसोडे, तालुका संघटक यांचा ओप्पो कंपनीचा मोबाईल, इलोसे क्र २) सविता पांडुरंग म्हस्के, अशा वर्कर यांच्याकडे लाचेची रक्कम व सैमसंग कंपनीचा मोबाईल मिळून आला यांचेवर पोलीस ठाणे घनसावंगी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे. सदरची कामगीरी श्रीमती, माधुरी केदार कांगणे, पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, श्री. शशिकांत सिंगारे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, श्री. बी. एस. जाधवर पोलीस उपअधीक्षक ला.प्र.वि. जालना यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक, कोमल शिंदे, सहायक सापळा अधिकारी, शरदचंद्र रोडगे, पोलीस निरीक्षक, व पथकातील पोलिस अंमलदार, पोहेकों/श्रीनिवास गुडुर, पोलिस अंमलदार, गणेश चेके, गजानन कांबळे, शिवलिंग खुळे, अमोल चेके लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना यांनी केली.

## बैलगाडा शर्यत हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा सांस्कृतिक ठेवा-ए.जे.बोराडे

मंठा। प्रतिनिधी

बैलगाडा शर्यत हा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा एक अत्यंत महत्त्वाचा आर्थिक कणा असून हा केवळ एक खेळ नसून शेतकरी आणि त्यांच्या लाडक्या बैलांमधील जिव्हाळ्याचे नाते निर्माण करणारा सांस्कृतिक ठेवा आहे असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे पाटील बोराडे यांनी केले. खंडोबा यात्रेनिमित्त लिंबेवडगाव ता. मंठा येथे भव्य बैलगाडा (जोडपट) शर्यतीचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते ॲड. पंकज बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले.

गुरुवार ता. १८ रोजी आयोजित




बैलगाडा शर्यतीच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे, माजी उपसभापती कल्याणराव खरात, योगेश पाटील अवचार, विष्णुपंत श्रावणे, तुळशीराम कुहिरे, रामराव वरकड, दीपक गायकवाड, रतन कळणे, एकनाथ खरात, अजिंक्य बोराडे यांची उपस्थिती होती. जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी उद्घाटन प्रसंगी सांगितले की, बैलगाडा शर्यतीला सुमारे ४०० ते ४५० वर्षाची जुनी परंपरा आहे, महाराष्ट्रातील यात्रा, जत्रा आणि सणांच्या काळात अशा शर्यतीचे आयोजन केले जाते. या शर्यतीमुळे गावांमध्ये एकोप्याची आणि उत्साहाची भावना निर्माण होते असे सांगितले. या बैलगाडा शर्यतीमध्ये पुणे, नाशिक, हिंगोली, कळमनुरी, जालना, परभणी, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा येथून स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेसाठी योगेश पाटील अवचार यांनी प्रथम, रतन कळणे यांनी द्वितीय, विष्णू श्रावणे यांनी तृतीय, अजिंक्य पाटील यांनी चौथे तर कल्याणराव खरात यांनी पाचवे बक्षीस जाहीर केले. या स्पर्धेसाठी लिंबेवडगाव व पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## जामखेड ईव्हीएम स्ट्रॉंगरूमसह मतमोजणी केंद्र तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी आज जामखेड येथील ईव्हीएम स्ट्रॉंगरूम, मतमोजणी केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी तेथील निवडणूक तयारीचा सविस्तर आढावा घेत आयोगाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले.

येथील श्री नागेश्वर सामाजिक सभागृह येथे जिल्हाधिकाऱ्यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी कर्मचारी प्रशिक्षण, ईव्हीएम यंत्रांचे वाटप, स्वीकृती याबाबतच्या नियोजनाची माहिती घेतली. तसेच यापूर्वीच्या निवडणुकीतील ईव्हीएम ठेवलेल्या स्ट्रॉंगरूमची पाहणीही त्यांनी केली. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने मतमोजणी केंद्रावर करण्यात आलेली तयारी, सुरक्षा उपाययोजनांची त्यांनी माहिती घेतली. यंत्रणांनी निवडणूक



आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन करावे, असे स्पष्ट आदेश डॉ. आशिया यांनी यावेळी दिले. याप्रसंगी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी अजय साळवे, तहसीलदार धनंजय बांगर, नायब तहसीलदार मच्छिंद्र पाडळे, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, नगरपरिषद निवडणूक विभागाचे मंगेश घोडेकर, स्थापत्य अभियंता आमेर शेख व महेश शेकडे आदी उपस्थित होते.

## शिक्षा बंदीने शिस्त आणि गुणवत्ता टिकेल का?

औसा । प्रतिनिधी

''छडी लागे छम छम'' या ओळीने वर्षानुवर्षे शाळांतील शिस्तीचे चित्र उभे केले.आता मात्र महाराष्ट्र सरकारने शाळांमधील शारीरिक व मानसिक शिक्षेला पूर्ण बंदी घालणारा शासन निर्णय जाहीर केला आहे.विद्यार्थ्यांच्या सुरक्षितता आणि सन्मानासाठी हा निर्णय योग्य असला,तरी मनात एक प्रश्नचिन्ह निर्माण होतो की,शिक्षा बंद केल्याने शिस्त आणि गुणवत्ता टिकून राहील का?

भीतीपोटी शिकणारे मूल काही काळ आज्ञाधारक वाटते,पण ते आत्मविश्वासू बनते का? शारीरिक किंवा मानसिक दंडामुळे मुलांच्या मनावर भीती,तणाव पडतो.मग पर्याय काय? शिक्षेऐवजी संवाद,समज आणि सकारात्मक मार्गदर्शन हा मार्ग स्वीकारण्याची तयारी शिक्षक आणि पालकांनी ठेवली आहे का? शाळेत घडलेल्या प्रत्येक घटनेवर दोषारोप न करता संवाद साधण्याची संयमशील भूमिका आपण घेऊ शकतो का? घरीही प्रेमळ शिस्त,स्पष्ट नियम आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन देण्याची जबाबदारी पालक घेणार आहेत का? शिक्षा बंदी हा शेवट नसून सुरुवात आहे.शाळा आणि घर यांचा सूर जुळला,तरच मुलांचा सर्वांगीण विकास शक्य होईल.अन्यथा हा निर्णय केवळ कागदावरच राहील.शिक्षण म्हणजे दबाव नव्हे,तर विकास हा विचार प्रत्यक्षात उतरवता येईल का? हाच आजचा खरा प्रश्नचिन्ह आहे. पालकांनी शाळेत घडलेल्या शिक्षेच्या बाबतीत लगेच दोषारोप न करता शिक्षकांशी संवाद साधा.मुलांचे ऐका,त्यांच्या वर्तनामागील कारणे समजून घ्या.घरीही सकारात्मक शिस्त पाळा स्पष्ट नियम,प्रेमळ शब्द आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन द्या.शाळा आणि घर यांचा सूर एकसारखा असेल तरच मुलांची प्रगती शक्य होते.शिक्षा बंद केल्याने शिक्षणक्रांती आपोआप घडणार नाही,पण पालकांनी जबाबदारीने साथ दिली तर मुलांचे शिक्षण अधिक आनंदी आणि सुरक्षित होईल.लक्षात ठेवा शिक्षण म्हणजे दबाव नव्हे,तर विकास,शिक्षा नव्हे,तर दिशा हे जाणून घ्यायला पाहिजे तेंव्हाच ''छडी लागे छम-छम आणं विद्या येई घम-घम'' याचं महत्व कळेल.

## शेतकऱ्यांच्या ज्वलंत मागण्यांकडे केंद्राचे दुर्लक्ष

### २३ डिसेंबरला शेवगांव मधील शेतकऱ्याचा जंतरमंतरवर उपोषणाचा इशारा!

अहिल्यानगर। प्रतिनिधी

शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, शेतमालाला कायदेशीर हमीभाव देऊन उत्पादन खर्चासह किमान ५० टक्के नफा सुनिश्चित करावा, तसेच शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या तातडीने मान्य कराव्यात, या मागण्यांसाठी केंद्र सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शेतकरी नेते बाळासाहेब शिंदे यांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय कृषिमंत्री तसेच भारत सरकारचे प्रधान सचिव यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. सध्याच्या शेतीधोरणांमुळे शेतकरी गंभीर आर्थिक अडचणीत सापडला असून, वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतमालाला योग्य दर मिळत नसल्याने शेतकरी कर्जबाजारी होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. परिणामी शेतकऱ्यांमध्ये नैराश्य वाढत असून, आत्महत्यांचे प्रमाण चिंताजनक पातळीवर पोहोचल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

देशात शेती उत्पादनाची मोठी क्षमता असतानाही चुकीच्या व अस्थिर धोरणांमुळे शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळत नसल्याचे स्पष्ट करत, केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांचे न्याय्य हक्क संरक्षणात घ्यावेत, अशी ठाम मागणी शेतकरी संघटनांकडून करण्यात आली आहे. निवेदनात प्रमुख मागण्यांमध्ये महागाईच्या पार्श्वभूमीवर शेतीमालाला कायदेशीर हमीभाव लागू करणे, उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा या सूत्रानुसार हमीभाव जाहीर करून शेतमालाची सरकारी पातळीवर खरेदी करणे, शेतीमालाचे भाव घसरल्यास तात्काळ मदत व आर्थिक उपाययोजना राबवणे, स्थिर व पारदर्शक राष्ट्रीय आयातनिर्यात धोरण आखणे, तसेच दीर्घकालीन आणि स्थिर राष्ट्रीय शेतीधोरण जाहीर करणे, यांचा समावेश आहे. याशिवाय नैसर्गिक आपत्तीला राष्ट्रीय आपत्तीचा दर्जा देऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तात्काळ व भरीव मदत देण्याचीही मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील जंतरमंतर मैदानावर शांततेच्या मार्गाने उपोषण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर उपोषण पूर्णतः शांततापूर्ण असून कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही, त्यामुळे प्रशासनाने कोणतीही पोलीस कारवाई अथवा दबाव टाकू नये, अशी विनंतीही निवेदनात करण्यात आली आहे. शासनाने वेळेत सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा शेतकरी नेते बाळासाहेब शिंदे यांनी दिला आहे

# अहिल्यानगर महावितरण कंत्राटी कामगारांना नियमित कर्मचाऱ्याचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

महावितरण कंपनीत कंत्राटी पद्धतीने काम करत असलेल्या कामगारांना नियमित कर्मचारी घोषित करत त्यांना नियमितची वेतनश्रेणी, पदोन्नती, वेतन फरक असे सर्व लाभ देण्याचे आदेश ठाणे औद्योगिक न्यायालयाने दिले आहेत. या आदेशानुसार अहिल्यानगर महावितरण कंपनीत कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या २९ कामगारांना नियमित कर्मचाऱ्याचा दर्जा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील सहा महिन्यांत आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत न्यायालयाने कंपनीला सुचित केले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राष्ट्रवादी वीज कामगार मजदूर कॉंग्रेसचे राज्य संघटक सुनिल वाघमारे यांनी दिली आहे. या संदर्भात महावितरणच्या नगरमधील कंत्राटी कामगारांनी न्यायालयाच्या आदेशाची प्रत महवितरणचे अधिक्षक अभियंता रमेश पवार व कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांना सोमवारी ( दि. १५ ) सादर केली. यावेळी संघटनेचे राज्य संघटक सुनिल वाघमारे यांच्यासह कामगार उपस्थित होते.

या संदर्भात निकाल देताना न्यायालयाने सर्व कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचारी म्हणून घोषित केले आहे. नोकरीत लागलेल्या दिनांकापासून २४० दिवस भरतील त्या दिवशीपासून कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचाऱ्यांना लागू असलेली वेतनश्रेणी, पदोन्नतीचे लाभ, वेतनाचे फरक आदी लागू केले आहेत. पुढील ६ महिन्यात कोर्टाच्या आदेशानुसार महावितरण कंपनीला कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित झाले आहेत. कोर्टाच्या आदेशानुसार महावितरणकडून अमलबजावणी न झाल्यास कोर्टात केस उभी झालेल्या दिवसापासून म्हणजे दि.२८.०९.२०१२ पासून सर्व कर्मचाऱ्यांना देय असलेल्या सर्व देणी रक्कमेवर ती अदा होण्याच्या दिनांकापर्यंत वार्षिक ५% व्याजाची आकारणी होणार आहे.

या आदेशानुसार नगरमधील ज्ञानेश्वर जनार्दन दहीवळकर, उकीर्डे सुभाष नामदेव, दळवी प्रसाद विलास, मच्छिंद्र शामराव जगताप, भिंगारदिवे सुनिल नानासाहेब, शरद मधूकर आवारे, कदम दिपक पोपट, प्रविण अरविंद बेंद्रे, गणेश भिमराव पंचमुख, अनिल यादव झेंडे, कुपाडे नंदकिशोर आनंद, कैलास पंढरीनाथ माने, परभाणे आबासाहेब भाऊसाहेब, राजेंद्र जगन्नाथ नन्नवरे , श्रीराम केशव वासकर, सोनवणे प्रकाश भागाजी, कुडाळ भास्कर पांडूरंग, चौधरी दिनेश पोपट, बेलोटे खंडू सखाराम, शिंदे कैलास अण्णासाहेब, मुळे सुरेश भाऊ, केदार सखाराम शिवाजी, ढूस संदीप रावसाहेब, घेमुड किसन अण्णासाहेब, गागरे गणपत गेणू , खेसे सुरेश कोंडीबा, गायकवाड भगवंत तुकाराम, भिंगारदिवे राहूल अशोक, डेरे संजय श्रीपत या कामगारांना लाभ मिळणार आहे. मागील १३ वर्षांपासून महाराष्ट्र राष्ट्रवादी वीज कामगार मजदुर कॉंग्रेस, (इंटक प्रणित संघटना) मुख्य कार्यालय,इंटक भवन,८० फुटी रोड, विश्रामबाग सांगली या संघटनेच्यावतीने कंत्राटी पद्धतीने दाखवलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना महावितरण कंपनीत सामावून घेण्यासाठी मे २०१२ साली मुंबईत महावितरणच्या मुख्य कार्यालयासमोर व आझाद मैदानावर जवळपास १ महिना आंदोलन केले. निशिकांत भोसले-पाटील यांच्या नेतृत्वाखाली तसेच इंटक संघटनेचे सर्व पदाधिकारीसह आंदोलन केले होते. या आंदोलनास त्यावेळचे संघटनेचे वरीष्ठ नेते आशीष जयंत मेहता (सध्या कार्यकारी अभियंता, सांगली शहर) यांनी देखील पाठिंबा दिलेला होता. कामगार महासंघाचे माजी अध्यक्ष अण्णासाहेब देसाई यांनीही आपल्या मागणीला पाठिंबा दिलेला होता. सदर आंदोलनाच्या मार्गाने न्याय मिळण्यापूर्वीच कंपनीने अनुभवी कर्मचारी डावलुन भरती प्रक्रिया राबवली. त्यामुळे सदर प्रक्रिया थांबवण्यासाठी आपले आंदोलन आझाद मैदानातून न्यायदेवतेच्या मंदिरात गेले. मुंबई उच्च न्यायालयात आपण संघटनेच्या माध्यमातून याचिका दाखल केली. ही याचिका ठाणे औद्योगिक न्यायालयात बऱ्याच वर्षांपासून सुरू होती. संघटनेकडून वकील श्री. गायकवाड यांनी कामगारांच्यावतीने उत्कृष्ट युक्तिवाद केला आहे. तसेच ठाणे येथील स्थानिक वकिल सौ.स्मिता डंखे ऊर्फ पाराठकर मॅडम यांचेही भरपुर सहकार्य लाभले. ठाणे औद्योगिक न्यायालयाने केसचा निकाल महाराष्ट्र शासनास सादर केला होता व त्याची अधिकृत घोषणा महाराष्ट्र शासनाच्या (कामगार आयुक्त) कामगार मंत्रालयाकडून जाहीर होणार होती.

सर्व कर्मचारी बांधवानी महावितरण कंपनीमध्ये सामावून घ्यावे यासाठी केलेली धडपड, घेतलेले कष्ट, संघटनेची निस्वार्थ भूमिका, कोर्टात केवळ आपल्या संघटनेच्या माध्यमातून व योग्य वकिलांच्या मदतीने यशस्वीपणे मांडलेला युक्तिवाद, सर्वांनी दाखवलेला विश्वास याचेच फलित म्हणून ठाणे औद्योगिक न्यायालयात बलाढ्य महावितरण विरुद्ध ऐतिहासिक विजय प्राप्त केलेला आहे असे वाघमारे यांनी म्हटले आहे.

# वाघ-सिंह समजणारे गेवराईचे पार्सल २१ तारखेला अजित पवारांना गिफ्ट करायचे-डॉ.योगेश क्षीरसागर

**बीड । प्रतिनिधी**

**ज्यांचा स्वतःच्या वॉर्डमध्ये पराभव होत आहे, असे लोक पेठ बीडमध्ये येऊन प्रचार करत आहेत. दर ६ महिन्याला नेता बदलण्याचे रेकॉर्ड त्यांच्या नावे आहे. आता हेच लोक गेवराईचे पार्सल आपल्याकडे घेऊन आले आहेत, स्वतःला वाघ-सिंह समजणारे, ते पार्सल २१ तारखेला 'डिझाईन बॉक्स'मध्ये पॅक करून पालकमंत्री अजितदादा पवार यांना गिफ्ट करायचे आहे, अशी टीका भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.**



बीड शहरातील प्रभाग क्र.३ चे भाजपचे उमेदवार अमृतकाका सारडा यांच्या प्रचारार्थ बुधवारी (दि.१७) रामतीर्थ कॉर्नर येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. या सभेस डॉ.सारिका क्षीरसागर, जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड.सर्जेराव तांदळे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योती घुंबरे, माजी जिल्हा परिषद सदस्य भारत काळे, नवनाथ शिराळे, अशोक लोढा, सलिम जहांगीर, संगीताताई धसे, राणा चौहान, बिभीषण लांडगे, नूर लाला, विलास जोगदंड, विलास मोमीन, अनिल चांदणे, प्रभाकर चांदणे, रोहन गायकवाड, परसराम जाधव, दत्ता परळकर, विक्की पाचांग्रे, विलास बामणे, संजय नलावडे, गणेश लोंढे, शैलाताई मुसळे, राजू महुवाले, सुशील जाधव यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रभाग क्र.३ च्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला अनुक्रमांक ०७ व कमळ चिन्हासमोरील बटण दाबून अमृतकाका सारडा यांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आवाहन केले. विकासाभिमुख, पारदर्शक आणि जनहिताला प्राधान्य देणारे नेतृत्व म्हणून अमृतकाका सारडा यांना नागरिकांनी संधी द्यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पेठ बीड भागातील विकासाचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील. त्यासाठी भाजपला संधी द्यावी, असे डॉ.क्षीरसागर म्हणाले. पुढे बोलताना त्यांनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला. जनतेला १००-५० वाले म्हणून हिणवणारे विरोधक आहेत, आता त्यांना जनता त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले. यावेळी अनेकांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, पेठ बीड भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिबट्याचा धस्का; नागरिकांनी सतर्क राहण्याचे उपजिल्हाधिकारी शेख यांचे आवाहन

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील ढाळेवाडी येथे काल-परवाच बिबट्याने शेतकऱ्यांच्या शेळीवर हल्ला केल्याची घटना घडली असून, या हल्ल्यात शेळी जागीच ठार झाली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

बिबट्या हा हिंस्त्र प्राणी असून तो आकाराने लहान असलेल्या सजीवांवर हल्ला करतो. त्यामुळे रात्री पाणी देणारे शेतकरी, शेतात काम करणारे शेतमजूर, महिला तसेच लहान मुलांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. लहान मुलांना शेतात एकटे पाठवू नये, तसेच मोकळ्या, निर्जन व अंधाराच्या ठिकाणी जाणे टाळावे, असे सूचित करण्यात आले आहे.

रात्रपाळीतील शेतकऱ्यांनी पाणी देताना एकट्याने न जाता एकापेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र जाणे सुरक्षित ठरेल. तसेच मुक्या प्राण्यांचीविशेषतः गाय, वासरे, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या व कुत्रेयांची रात्री बंद व सुरक्षित जाळीत व्यवस्था करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, बिबट्या दिसल्यास नागरिकांनी तात्काळ वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे. यासाठी उपजिल्हाधिकारी अधिकारी वसिमा शेख, पाटोदा यांचा संपर्क क्रमांक ०२४४४-२४२३२९ देण्यात आला आहे.

नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता आवश्यक ती खबरदारी घेऊन प्रशासनास सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## गेवराईच्या डॉक्टरला सहा लाखाला गंडा; सायबर पोलिसांकडून दोघांना अटक

बीड । प्रतिनिधी

पॅन आणि आधारकार्ड चा गैरवापर करून गेवराईच्या एका डॉक्टरला सहा लाखाला गंडा घालणाऱ्या दोघांना सायबर पोलिसांनी पुण्यातून अटक केली.



गेवराई येथील डॉक्टरच्या फसवणूक प्रकरणात कलम ३१८(४)३(५) बी.एन.एस. सह कलम ६६,६६ (क) आय.टी. अ‍ॅक्ट २००० अन्वये दाखल गुन्ह्यातील दोन आरोपींना सायबर पोलीस स्टेशन बीड येथिल पथकाने शिरगांव व चिखली पुणे येथुन अटक केली आहे. यामध्ये आरोपी नामे विकास बाबासाहेब वाघमारे वय. ३४ वर्ष रा शिरगाव जि पुणे व महेश तुळशिराम सेटेलु वय.४४ वर्ष घरकुल हाउसिंग सोसायटी चिखली जि पुणे हे दोघे मनि लाँडरींग मध्ये आधारकार्ड व पॅनकार्डचा वापर केला असल्याची तक्रारदार डॉ. सय्यद मुक्तार रा. गेवराई बीड यांची ५,९५,४४१/-रु ची आर्थीक फसवणुक करण्यात आली होती.

तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सायबर पोलीसांनी तांत्रीक विश्लेषण व डिजीटल पुरावे गोळा करुन आरोपींचा शोध घेण्यात आला. या तपासातुन फसवणुक करणाऱ्या दोन आरोपींना शिरगांव साई मंदीर मागची बाजु पुणे व घरकुल हाउसिंग सोसायटी चिखली पुणे येथुन अटक करण्यात आली पुढील तपास सुरु असुन गुन्ह्यात इतर कोणी ◀◀ पान ३ वर

## फसवणूक झालेली रक्कम तक्रारदारास परत ;सायबर पोलिसांची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील हिंगणी येथील मीनाक्षी आंधळे यांचे आधार कार्ड आणि पॅन कार्ड वापरून जवळपास एक लाख ३३००० ची रक्कम परस्पर काढून घेण्यात आली होती. ही रक्कम सायबर पोलिसांनी या महिलेला परत केली.



सायबर पोलीस ठाणे बीड येथे कलम ३१८(४)३(५) बी.एन.एस. सह कलम ६६,६६ (क) आय.टी. अ‍ॅक्ट २००० अन्वये गुन्हा दाखल होता यामध्ये तक्रारदार यांचे मोबाईल व सिमकार्ड चा वापर करुन आरोपींनी तक्रारदार नामे मिनाक्षी दत्ता आंधळे रा हिंगणी ता.जि.बीड यांचे बँक खात्यावरील १,३३,९९५/-रु फसवणुक करुन काढुन घेतली होती. तक्रारदाराने केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सायबर पोलीसांनी तांत्रीक विश्लेषण व बँकेकडुन प्राप्त माहिती वरुन आरोपींचा शोध घेण्यात आला. या तपासातुन फसवणुक करणाऱ्या आरोपीकडुन ८९,०००/-रु जप्त करण्यात आले. असुन मुख्य तिसऱ्या आरोपीचा शोध घेत आहेत.

जप्त करण्यात आलेली रक्कम रुपये ८९,०००/- हि उपविभागीय पोलीस आधिकारी पुजा पवार मॅडम यांचे हस्ते तक्रारदार मिनाक्षी दत्ता आंधळे यांना सुपूर्द करण्यात आली.

हि कारवाई पोलीस अधीक्षक बीड, अपर पोलीस अधीक्षक बीड, उपविभागीय पोलीस आधिकारी बीड यांचे मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाणे बीड चे पोनि निलेश केळे, सपोनि संदिप अराक , सहा. पोउपनि.भारत जायभाये, पोह विजय घोडके, पो. अं.निलेश उगलमुगले, पो.अं. श्रीक्रष्ण टेकाळे यांच्या पथकाने केली.

## मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या कृतीचा जाहीर निषेध

**पाटोदा । प्रतिनिधी**

**भारत देश महिलांचा सन्मान करणारा देश आहे .महिलांचा करू सन्मान ,तर देश बनेल महान आणि याच देशांमध्ये बिहार राज्याचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या एका जाहीर कार्यक्रमातील कृतीमुळे राज्यभरात तीव्र संताप व्यक्त होत आहे. एका व्हिडिओत मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी कार्यक्रमादरम्यान एका डॉक्टर महिलेचा बुरखा हटवल्याचा प्रकार दिसून येत असून, ही घटना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली आहे.**

संबंधित व्हिडिओ समोर आल्यानंतर विविध सामाजिक, धार्मिक व मानवाधिकार संघटनांनी या कृतीचा जाहीर निषेध नोंदवला आहे. हिजाब हा केवळ एक कपड्याचा तुकडा नाही.तर महिलेच्या वैयक्तिक श्रद्धा, धार्मिक संस्कार व वैयक्तिक निवडीचे प्रतीक आहे. पोशाखाबाबत जबरदस्ती करणे हे घटनात्मक अधिकारांचे उल्लंघन असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. सार्वजनिक मंचावर अशा प्रकारची कृती अत्यंत निंदनीय व असंवेदनशील आहे. मुख्यमंत्री पदावर असलेल्या व्यक्तीकडून संयम, सन्मान आणि संवेदनशीलतेची अपेक्षा असते, महिलांच्या सन्मानाशी संबंधित अशा घटना समाजात चुकीचा संदेश देते. दरम्यान, या घटनेबाबत मुख्यमंत्र्यांकडून अद्याप अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नाही. मात्र, वाढत्या दबावामुळे केंद्र व राज्य सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी. व मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी विविध स्तरांतून होत आहे.

## प्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ डॉ. धीरज सर्वज्ञ यांना पितृशोक

बीड । प्रतिनिधी

येथील शासकीय आयटीआय मधून सेवानिवृत्त झालेले श्रीकृष्ण सर्वज्ञ याचे राहत्या घरी वृद्धापकाळाने दुखत निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ७८ होते. श्री श्रीकृष्ण सर्वज्ञ हे मनमिळावू स्वभावाचे व कडक शिस्तीचे म्हणून परिचित होते. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. गुरुवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे, सुना असा परिवार आहे. बीड येथील प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ धीरज सर्वज्ञ व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख अँड रोहित सर्वज्ञ यांचे ते वडील होते.



गुरुवार १८ डिसेंबर रोजी बीड येथील अमरधाम स्मशानभूमी मध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले त्यावेळी बीड येथील डॉक्टर मंडळी, वकील मंडळी, भारतीय शिक्षक प्रसारक संस्थेचे शिक्षक तसेच संस्था पदाधिकारी याबरोबरच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांचा लिंबागणेश सर्कलच्या वतीने सत्कार

बीड । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील जनतेचे वैयक्तिक लाभाचे सिंचन विहिरी रेशीम घरकुल व इतर योजना सह ग्रामपंचायतच्या प्रत्येक योजनेची प्रभावीपणे आणि सुपरफास्ट प्रशासन ठेवून अंमलबजावणी करणारे कर्तव्यदक्ष गटविकास अधिकारी म्हणून नावलौकिक असणारे जिल्ह्याचे भूमिपुत्र व बीड पंचायत समितीचे प्रभारी बीडिओ श्री अनिरुद्ध सानप साहेब यांचा आज लिंबागणेश सर्कलच्या वतीने शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख तथा छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गणेश बप्पा उगले यांच्या शुभ हस्ते व सर्कलमधील सरपंच उपसरपंच पत्रकार व ग्रामीण भागातील विविध पक्ष संघटनेच्या ◀◀ पान ३ वर



## श्री मंगलनाथ मल्टीस्टेटला ग्रीन को २०२५ पुरस्कार जाहीर

### सहकार मंत्री ना. अतुल सावे यांच्या हस्ते होणार पुरस्काराचे वितरण

माजलगाव । प्रतिनिधी

जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील प्रगत अनुभव आव्हाने आणि भविष्यातील दिशा घडून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉसातून को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने सहकार मंथन २०२५ या कार्यक्रमाचे आयोजन सहकार सभागृह विद्यापीठ रोड शिवाजीनगर पुणे येथे आयोजित करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा. श्री बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते ग्रीन को २०२५ या पुरस्काराने माजलगाव शहरातील श्री मंगलनाथ मल्टीस्टेट या संस्थेला सन्मानित करण्यात येणार आहे.



या कार्यक्रमाचे उद्घाटक अपारंपारिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण विकास मंत्री महाराष्ट्र राज्य अतुल सावे,सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य डॉ. संजय कोलते, अध्यक्ष कॉसमॉस को-ऑपरेटिव बँक लिमिटेड अ‍ॅड.प्रल्हाद कोकरे, प्रजासक राज्य सहकारी बँक लिमिटेड मुंबई चे श्री विद्याधर अनासकर हे उपस्थित राहणार आहेत. सहकार क्षेत्रामध्ये मराठवाड्यातील साखर कारखाने जिनिंग्स व विविध सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. श्रीमंगलनाथ मल्टीस्टेट चे संस्थापक अध्यक्ष श्री आर.जी कानडे व संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक अ‍ॅड.रवींद्र कानडे यांनी या पुरस्काराबद्दल माध्यम अशी बोलताना सांगितले की,संस्थेच्या पारदर्शक व्यवहार वेळेवर कर्जवाटप व वसुली ठेवीदारांचा विश्वास संपादन, स्वयंरोजगार निर्मिती,महिला व युवक सक्षमीकरण व त्याचबरोबर सामाजिक उपक्रम या सर्व बाबींची दखल घेत श्री मंगलनाथ मल्टीस्टेट ही संस्था या पुरस्काराची मानकरी ठरली आहे. श्री मंगलनाथ मल्टीस्टेटच्या सातत्यपूर्ण व लोकाभिमुख कामगिरीची ही पोच पावती आहे. निश्चितच हा पुरस्कार माजलगाव चे नाव लौकिक करत असून संस्थेच्या कार्याला अधिक प्रेरणा व ऊर्जा देणार आहे सदरील पुरस्कार संस्थेचे हितचिंतक,सभासद सर्व कर्मचारी वृंद यांच्या सहकार्याचे व परिश्रमाचे फलित असून सदरील पुरस्कार त्यांना समर्पित करण्यात येत आहे.

## आष्टी व कासारी मुर्शदपूर हद्दीमध्ये श्वान व वराहाचा उच्छाद

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी शहरात व आष्टी स्वभावताली असलेल्या वस्त्यांवर व आष्टी शहराला लागून असलेल्या कासारी मोचतपूर ग्रामपंचायत हद्दीमध्ये मोठ्या प्रमाणावर डुकरांची व कुत्र्याची संख्या वाढल्याने नागरिकांना या चा प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत आहे आष्टी शहराच्या खडकत रोडला मंगल कार्यालय मोठ्या प्रमाणावर असल्याने या ठिकाणी काही मंगल कार्यालयामध्ये मुस्लिम धर्मियांचे विवाह सोहळे पार पडतात यामध्ये मांसाहार जेवण असते मांसाहारी जेवणात उरलेल्या बिर्याणी नावाचा पदार्थ फेकून दिला जातो यामुळे या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर कुत्र्यांची संख्या झाली असून हे मांसाहार करणारे कुत्रे अगदी हिंसक बनले आहेत या खडकत रोडवरील रेडेकर वस्ती तसेच



या परिसरामध्ये शेळी असेल जनावरे असतील यांच्यावर देखील कुत्र्यांनी हल्ले चालवले आहेत तर माणसांना देखील चावा घेतला आहे तसेच आष्टी शहरांमध्ये डुकरांची संख्या प्रचंड वाढल्याने हे प्राणी मोठ्या प्रमाणावर घाण निर्माण करत आहेत यामुळे शहरात राहणाऱ्या नागरिकांना फार मोठ्या दुर्गंधीला सामोरे जावे लागत आहे या दोन्ही गंभीर बाबीकडे नगरपंचायतने लक्ष घालून यावर लवकर उपाययोजना करावी अशी मागणी शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी केली आहे तरी नगरपंचायत च्या सिओ साहेबांनी लवकरात लवकर या डुकरांचा व कुत्र्यांचा बंदोबस्त करावा नसता येणाऱ्या काही दिवसात असती शहरातील नागरी नगरपंचायतच्या दारात धरणे आंदोलन करणार आहेत.

## तपोवन बचावासाठी माजलगावातून जोरदार जनआवाज

### वृक्षतोडीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा यासाठी तहसीलदारांना निवेदन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील नागरिकांनी एकत्र येऊन नाशिकमधील तपोवन परिसरातील प्रस्तावित हजारो वृक्षतोडीच्या निर्णयाविरोधात माजलगावातून आज बुलंद आवाज उठवला. पर्यावरणप्रेमी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व स्थानिक मंडळी एकत्र येत तहसीलदार संतोष रुईकर यांना निवेदन देऊन या निर्णयाचा तीव्र निषेध नोंदवला. तपोवन रक्षणासाठी नाशिककरांनी सुरू केलेल्या आंदोलनाला माजलगावातून मिळालेला हा ठाम पाठिंबा लक्षवेधी ठरला.



निवेदनात सांगितले आहे की, तपोवन परिसर नैसर्गिक वारसा, सांस्कृतिक पवित्रता आणि जैवविविधतेने नटलेला प्रदेश असून, येथील वृक्षतोड ही निसर्गावर चाललेली थेट गदा आहे. ''वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे'' या संत तुकारामांच्या विचाराचा उल्लेख करत वृक्षतोड ही मानव-निसर्ग संबंधाची माती करण्यासारखी कृती असल्याचे वृक्षप्रेमींनी स्पष्ट केले. तसेच, कुंभमेळयासाठी नवे रस्ते, तात्पुरत्या सोयी-सुविधा आणि वाहतूक वाढवण्यासाठी तपोवनातील झाडांचा बळी देण्याचा प्रस्ताव पर्यावरणास हानीकारक तर आहेच, पण धार्मिक समारंभाच्या नावाखाली निसर्गाचा विध्वंस करणे योग्य नसल्याचे नागरिकांनी नमूद केले. ''वैज्ञानिक नियोजन करून पर्यायी रस्ते किंवा उड्डाणपूल उभारता येऊ शकतात, पण शेकडो वर्षे जुनी झाडे पुन्हा उभी राहू शकत नाहीत,'' अशी भूमिका त्यांनी मांडली.संत ज्ञानेश्वरांच्या ''सगळी सृष्टी ◀◀ पान ३ वर

## बीडमध्ये विजय काकडे यांच्या पुढाकारातून वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम संपन्न

बीड । प्रतिनिधी

रात्रीच्या वेळी वाहनांची दृश्यता वाढून अपघातांचे प्रमाण कमी व्हावे, या महत्त्वपूर्ण उद्देशाने विश्वगती मोटर मालकचालक ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने वाहन सुरक्षेसाठी





वाहनांवर प्रत्यक्ष रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष विजय नाना काकडे यांच्या पुढाकारातून बीड जिल्हा वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक सानप साहेब, पाडळसिंगी महामार्ग पोलीस, मांजरसुंबा महामार्ग पोलीस उपनिरीक्षक ढगरे साहेब, तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे (आरटीओ) गावडे साहेब यांच्या उपस्थित घेण्यात आला.

रात्रीच्या वेळी अनेक वेळा जड व मालवाहू वाहनांची योग्य दृश्यता नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता वाढते. ही बाब लक्षात घेऊन वाहनांच्या मागील व बाजूच्या भागावर रिफ्लेक्टर लावण्याचा कार्यक्रम विश्वगती मोटर मालकचालक ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# साडेतीन कोटींचे ड्रग्स रॅकेट उद्ध्वस्त
## २४ वर्षांच्या तरुणांचा प्रताप पाहून पोलीसही चक्रावले

**पुणे । प्रतिनिधी**

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलिसांनी अमली पदार्थ विक्रेत्यांविरुद्ध कारवाई केली आहे. पिंपरीत एका सदनिकेवर छापा टाकून हायड्रोपोनिक गांजा जप्त केला. सदनिकेतच हायड्रोपोनिक गांजाची लागवड केल्याचे आढळले. याप्रकरणी अटक केलेल्या आरोपींने मिळालेल्या माहितीनंतर पुणे, पिंपरीसह मुंबई, गोव्यात कारवाई केली.

कारवाईत पोलिसांनी मेफेड्रोन, ओझीकुश (हायड्रोपोनिक गांजा), चरस, एलएसडीसह वेगवेगळ्या प्रकारचे अमली पदार्थ जप्त केले. जप्त केलेल्या अमली पदार्थांची किंमत साडेतीन कोटी रुपये आहे.तुषार चेतन वर्मा (वय २१, सध्या रा. शितळादेवीनगर, सूस, मूळ रा. दिल्ली), सुमीत संतोष डेडवाल (वय २५, सध्या रा. मधुबन कॉलनी, सांगवी, मूळ रा. शिक्षक कॉलनी, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर), अक्षय सुखलाल महेर (वय २५, सध्या रा. एक्सर्बिया टाऊनशिप, हिंजवडी, मूळ रा. प्रगती



कॉलनी, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर), मलय राजेश डेलीवाला (वय २८, रा. अमृतनगर, घाटकोपर, मुंबई), स्वराज अनंत भोसले (वय २८, रा. खोत चाळ, कुर्ला, मुंबई) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. आरोपी तुषार वर्मा अमली पदार्थांची विक्री करत असल्याची माहिती तपासात मिळाली होती.

त्यानंतर पोलिसांनी खडकीत सापळा लावून त्याला पकडले. त्याच्या चौकशीत साथीदार सुमीत डेडवाल, अक्षय महेर हे पिंपरीत भाड्याच्या सदनिकेत राहत असल्याची माहिती मिळाली. वर्मा, डेडवाल, महेर यांनी सदनिकेत हायड्रोपोनिक गांजाची लागवड केल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंपरीत छापा टाकला. वर्मा, डेडवाल, महेर यांच्या चौकशीत मलय डेलीवाला हा मुख्य असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी डेलीवाला, भोसले यांना मुंबईतून ताब्यात घेतले. गोव्यातील कारवाईत पोलिसांनी तीन कोटी ४५ लाखांचे अमली पदार्थ जप्त केले.पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, उपायुक्त सोमय मुंडे, सहायक आयुक्त विठ्ठल दबडे, खडकी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विक्रमसिंह कदम, गुन्हे शाखेचे निरीक्षक किरण गायकवाड, उपनिरीक्षक दिग्विजय चौगले, बाणेर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोलीस कर्मचारी भोरे, अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड, पोलीस निरीक्षक प्रशांत अन्नछत्रे, खंडणी विरोधी पथकाच्या पोलीस निरीक्षक वर्षा देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक नितीनकुमार नाईक, जाधव, दिनेश भारकड, उपनिरीक्षक वैभव पाटील, विराज शिंदे (सहारा पोलीस ठाणे, मुंबई) यांनी ही कारवाई केली.

# पुण्यात भाजप-शिवसेनेची जागा वाटपाची चर्चा; मात्र रवींद्र धंगेकरांना डावललं

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना यांच्यात जागावाटपासंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा सुरू झाली आहे. या चर्चेत एक उल्लेखनीय बाब म्हणजे शिवसेनेचे पुणे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर (ठरींळपवीर उहरपसशज्ञरी) यांना पूर्णपणे डावलण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी धंगेकर यांनी पुण्यातील जैन बोर्डिंग प्रकरणात भाजपचे पुणे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर तीव्र टीका केली होती. त्यामुळे आजच्या बैठकीसाठी त्यांना आमंत्रण देण्यात आले नसल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे धंगेकरांना पक्षाकडूनच डावलले जात असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.



या चर्चेच्या अनुषंगाने आज पुण्यातील रामी ग्रँड हॉटेलमध्ये दोन्ही पक्षांच्या नेत्यांची बैठक सुरू झाली. या बैठकीत भाजपचे नेते मुरलीधर मोहोळ, चंद्रकांत पाटील, माधुरी मिसाळ, धीरज घाटे, तर शिवसेनेच्या बाजूने नीलम गोऱ्हे, विजय शिवतारे आणि नाना भानगिरे यांसारख्या प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. या बैठकीचा मुख्य उद्देश पुणे महापालिका निवडणुकीसाठी जागावाटपाची रणनीती ठरविणे हा आहे. महायुतीच्या या बैठकीत दोन्ही पक्षांच्या स्थानिक नेत्यांना आमंत्रित करण्यात आले असले, तरी धंगेकर यांना मात्र या चर्चेतून वगळण्यात आले आहे. भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजपने आपल्या स्थानिक नेत्यांना आमंत्रण दिले आहे, तर शिवसेनेनेही आपल्या नेत्यांना आमंत्रित केले आहे. मात्र, धंगेकर यांना शिवसेनेकडूनच निमंत्रण न देण्यात आल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर धंगेकरांना भाजप नव्हे तर स्वतःच्या पक्षाकडूनच डावलले जात असल्याचा प्रश्न उपस्थित होत आहे. महायुतीच्या चर्चेत शिवसेना भाजपकडे ३५ ते ४० जागांसाठी प्रस्ताव देणार असल्याची चर्चा आहे, तर धंगेकर मात्र १६५ जागा लढवण्यावर ठाम असल्याचे बोलले जात आहे. या मतभेदांमुळे पक्षांतर्गत तणाव वाढण्याची शक्यता आहे.

रवींद्र धंगेकर यांच्या राजकीय प्रवासाकडे नजर टाकली तर, ते मूळचे काँग्रेसचे नेते होते. पुण्यातील कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या चिन्हावर विजय मिळवला होता. मात्र, २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांना भाजपचे उमेदवार हेमंत रासने यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. या पराभवानंतर धंगेकर यांनी काँग्रेस सोडून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. पक्षप्रवेशानंतर सुरुवातीला ते काही काळ शांत राहिले होते. मात्र, नुकत्याच पुण्यातील जैन बोर्डिंग प्रकरणात त्यांनी भाजप नेत्यांवर जोरदार हल्लाबोल केला. या टीकेमुळे त्यांना महायुतीच्या चर्चेतून वगळण्यात आल्याचे मानले जात आहे. एकंदरीत, पुणे महापालिका निवडणुकीच्या जागावाटप चर्चेत धंगेकरांच्या अनुपस्थितीमुळे पक्षांतर्गत आणि महायुतीतील मतभेद उघड होत आहेत. या घटनेच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेत धंगेकरांची भूमिका काय राहणार आणि महायुतीची रणनीती कशी आकार घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ही निवडणूक पुण्यातील राजकीय समीकरणे बदलू शकते, अशी चर्चा आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये उद्धव ठाकरेंना मोठा धक्का, शहराध्यक्ष संजोग वाघेरेंचा पक्षाला रामराम, लवकरच भाजपमध्य प्रवेश

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

महानगरपालिका निवडणुकांची घोषणा झाली आहे. १५ जानेवारीला यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. पिंपरी चिंचवडमध्ये (झळाीिळ उहळपलहुरव) शिवसेना ठाकरे गटला मोठा धक्का बसला आहे. ठाकरे सेनेचे पिंपरी चिंचवड शहराचे अध्यक्ष संजोग वाघेरे (डरपक्षेस थरसहशीश) यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. ते लवकरच भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. हा शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का मानला जात आहे.



पिंपरी चिंचवडमध्ये भाजपने उद्धव ठाकरेंना मोठा धक्का दिला आहे. शहराध्यक्ष संजोग वाघेरेंचा लवकरचं भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. वाघेरे यांनी शहराध्यक्ष पदासह सदस्यत्वाचाही राजीनामा दिला आहे. राजीनाम्यानंतर येत्या एक-दोन दिवसात भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती संजोग वाघरेंनी दिली आहे. ०२४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी (डेज्ञ डरलहर एश्रशलींळेप २०२४) संजोग वाघेरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटातून त्यांनी मावळ लोकसभेची निवडणूक लढवली होती. महायुतीकडून शिंदे गटाचे श्रीरंग बारणे त्यांच्यासमोर उमेदवार होते. बारणे विरुद्ध वाघेरे यांच्या सामन्यात श्रीरंग बारणे यांनी पुन्हा बाजी मारल्याचं पाहायला मिळालं होतं. राज्यात २९ महानगरपालिकांच्या निडणुकांचे बिगुल वाजले आहे. १५ जानेवारीला यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर १६ जानेवारीला या निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. त्यामुळं राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मोठ्या प्रमाणात सध्या भाजपमध्ये पक्ष प्रवेश होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

# वैद्यकीय वादांवर स्वतंत्र यंत्रणेची गरज -ॲड. श्रीकांत ठाकूर



**पुणे । प्रतिनिधी**

रूग्णालय आणि रुग्ण यांच्यातील वाद वारंवार रस्त्यावर येत असतील, तर दोष केवळ व्यक्तींचा नसून त्वरित, निपक्ष आणि विश्वासार्ह निर्णय देणारी स्वतंत्र यंत्रणा अस्तित्वात नसणे हे त्यामागचे मुख्य कारण आहे.

वैद्यकीय कायदा २०१० मधील कलम ७ अंतर्गत राज्यात स्वतंत्र प्राधिकरणाची स्थापना झाल्यास अशा घटना टाळता येऊ शकतात. त्यामुळे रुग्ण, डॉक्टर आणि राज्य यांच्यातील घटनात्मक समतोल राखण्यास मदत होईल, असे मत ड. श्रीकांत ठाकूर यांन व्यक्त केले. त्यांनी पाठवलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे की, प्राधिकरणासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत. यासाठी लवकरच वकिलांची एक तज्ञ समिती तयार केली जाईल. दरम्यान हडपसर येथे रुग्णाच्या मृत्यूनंतर रुग्णालयाची तोडफोड करणाऱ्यांना न्यायालयाने जामिन देत दिलासा दिला आहे. या प्रकरणात आरोपींच्या वतीने ड. प्रियंका जाधव-काटकर, ड. श्रद्धा प्रकाश जाधव, ड. कुणाल सोनवणे आणि ड. अर्थव पिंगळे यांनी न्यायालयात युक्तिवाद सादर केला.

# केशवनगरमध्ये बिबट्याचा वावर; दोन सोसायट्यांच्या सीसीटीव्हीत कैद

**मुंढवा । प्रतिनिधी**

केशवनगरमधील कोणार्क रिवा व अरकॉन सिल्वर लीप या दोन सोसायट्यांच्या सीसीटीव्हीमध्ये गुरुवारी (दि.१८) पहाटे बिबट्या दिसून आला. याची माहिती मिळताच हवेली वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी केशवनगरमध्ये दाखल झाले. मात्र, सायंकाळी उशिरापर्यंत शोध घेऊनही बिबट्या आढळून आला नाही.



आजूबाजूच्या सोसायट्यांचे सीसीटीव्ही तपासले असता केशवनगरमधील नदीपात्राकडील बाजूस बिबट्या गेला असल्याचे आढळून आले आहे. प्रशासनाने केशवनगरमधील नागरिकांना सतर्कतेच्या सूचना दिल्या असून, बिबट्या दिसताच ११२ या पोलिस हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. येथील रेणुकामाता मंदिराजवळील कोणार्क रिवा सोसायटीच्या गेटशेजारी गुरुवारी पहाटे सव्वादोन वाजता तर या सोसायटीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या अरकॉन सिल्वर लिप या सोसायटीच्या आवारात पहाटे सव्वाचार वाजता बिबट्या जात असल्याचे सोसायटीच्या सीसीटीव्हीमध्ये दिसून आले. या सोसायटीच्या वॉचमननेही बिबट्या येथून जात असल्याचे पाहिले आहे. वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी सकाळी या ठिकाणी आले व शोधाशोध केली असता या सोसायट्यांच्या आवारात बिबट्याचे ठसे दिसून आले. पोलिस व वन विभागाच्या अधिकार्यांनी आजूबाजूच्या सोसायट्यांचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता केशवनगर येथील नदीपात्राच्या बाजूला बिबटचा गेला असल्याचे आढळून आले. येथील स्थानिक नागरिक जितीन कांबळे, गणेश बधे, श्रीकांत सूर्यवंशी, प्रवीण प्रधान, सुधीर श्रीवास्तव, बाबा कोरे, मोहन भालेराव, अनिकेत गागडे, अनिल भांडवलकर, दिलीप भंडारी यांनी बिबटचाला शोधण्यासाठी वन विभागाच्या अधिकार्यांना सहकार्य केले.फेब्रुवारी २०१९ मध्ये केशवनगर येथील म्हसोबावस्तीतील व्हर्टिकल इन्फ्रास्ट्रक्चर या सोसायटीच्या आवारात शिरलेल्या बिबट्याला प्रशासनाने जेरबंद केले होते. मागील सहा महिन्यांपूर्वीही केशवनगर परिसरात बिबट्या दिसला असल्याचे नागरिक सांगतात. गुरुवारी पहाटे केशवनगर येथील दोन सोसायट्यांच्या सीसीटीव्हीमध्ये बिबट्या दिसून आला आहे.

# तक्रार मागे घेण्यासाठी पीडितेलाच ठेवले डांबून

पिंपरी । प्रतिनिधी

कंपनीतील मानसिक त्रासातून न्याय मिळवून देण्याच्या बहाण्याने दोन महिला सामाजिक कार्यकर्त्यांनी एका पीडित महिलेकडून ७० हजार रुपये उकळले. त्यानंतर कंपनीच्या एचआर विरोधातील तक्रार मागे घेण्यासाठी दबावतंत्राचा वापर करत त्यांनी फिर्यादी महिलेस दोन दिवस डांबून ठेवले.

तसेच पीडित महिलेकडूनच आणखी एक लाख रुपयांची मागणी करून जीवे मारण्याची धमकी पुन्हा खंडणी उकळली दिली. ही घटना सप्टेंबर २०२४ ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत चाकण येथे घडली.या प्रकरणी एका ३८ वर्षीय महिलेने सोमवारी (दि. १५) चाकण पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चाकण येथील दोन महिला सामाजिक कार्यकर्त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेला त्यांच्या कंपनीतील एच. आर. हेडकडून झालेल्या मानसिक त्रासाबाबत न्याय मिळवून देण्याचे आमिष आरोपींनी दाखवले. त्यासाठी त्यांनी कंपनीच्या एच.आर. हेड विरोधात तक्रार अर्ज घेतला आणि कामासाठी पैसे लागतील असे सांगून सप्टेंबर २०२४ ते सप्टेंबर २०२५ या दरम्यान वेळोवेळी रोख ७० हजार रुपये घेतले. त्यानंतर, आरोपींनी एच.आर. हेडकडूनही प्रकरण मिटविण्याच्या नावाखाली पैसे घेतले. त्यानंतर फिर्यादीवर तक्रार अर्ज मागे घेण्यासाठी दबाव टाकला. दबावतंत्राचा भाग म्हणून १९ ते २१ सप्टेंबर २०२५ दरम्यान महिलेस एका आरोपी महिलेच्या घरात दोन दिवस डांबून ठेवण्यात आले. तसेच, त्यांनी पुन्हा पीडित महिलेकडेच एक लाख रुपयांची मागणी करत पैसे न दिल्यास 'कोठेतरी नेऊन टाकून देऊ' अशी धमकी दिली. या भीतीमुळे फिर्यादी आणि त्यांच्या पतीने २४ सप्टेंबर २०२५ रोजी दोन्ही महिला आरोपींना प्रत्येकी ३०-३० हजार रुपये दिले.

# तहसीलदार कार्यालयासमोरच सुरू झाले बेमुदत महाधरणे; दलित, बहुजन समाजाचा एल्गार!

**शिरूर । प्रतिनिधी**

तहसीलदार कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख आणि पोलीस प्रशासनाकडून मागासवर्गीय, दलित व बहुजन समाजावर झालेल्या कथित अन्याय-अत्याचार व प्रलंबित प्रकरणांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोमवार, (दि. १५) पासून शिरूर तहसीलदार कार्यालयाच्या आवारात बेमुदत महाधरणे आंदोलनास सुरुवात करण्यात आली आहे.



हे आंदोलन सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र लक्ष्मण आल्हाट यांच्या नेतृत्वाखाली लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सामाजिक संस्था व राष्ट्रीय स्मारक समिती यांच्या वतीने आयोजित करण्यात आले आहे. प्रशासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, जोपर्यंत न्याय मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. पीडित नागरिकांनी त्यांच्या तक्रारी लेखी स्वरूपात द्याव्यात, असे आवाहन आल्हाट यांनी केले असून प्राप्त तक्रारींच्या आधारे प्रशासनाला जाब विचारला जाणार आहे.या आंदोलनातील प्रमुख मागण्यांमध्ये किसन सखाराम काकडे यांच्या मालमत्तेतील हेराफेरीची चौकशी करणे, बाळासाहेब खंडू जाधव यांच्या जमिनीची चुकीची फाळणी व नोंदी रद्द करून सातबारा दुरुस्त करणे, तसेच माजी सैनिक साहेबराव भागुजी जाधव यांच्या शासकीय जमिनीतील बेकायदा नोंदींची तपासणी करून दोषींवर कारवाई करणे यांचा समावेश आहे.

प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाला खंडू गंगणे, सतीश तागड, दादाभाऊ लोखंडे, नीलेश पवार, एजाज बागवान, शहाजी जाधव, लालासाहेब वाघचौरे, सोमनाथ परदेशी तसेच निळं वादळ सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष दिपिका भालेराव यांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे.

# ट्रॅक्टरच्या भीषण धडकेत १२ वर्षीय मुलाचा मृत्यू, आई गंभीर जखमी; चालकावर गुन्हा दाखल

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

दुचाकीवरून मुलाला घेऊन चाललेल्या महिलेच्या दुचाकीला ट्रॅक्टरची धडक बसल्याने झालेल्या भीषण अपघातात १२ वर्षीय बालकाचा मृत्यू झाला आहे. या घटनेत मुलाची आई गंभीर जखमी झाली असून, शिक्रापूर पोलीस ठाण्यात ट्रॅक्टर चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्रापूर येथील पुणे-नगर महामार्गावर क्सिस बँकेत कार्यरत असलेल्या हेमलता खरपुडे या सायंकाळच्या सुमारास एम एच १२ क्यू झेड ४२८४ या दुचाकीवरून त्यांचा मुलगा रुद्र याला घेऊन पाबळ चौकातून जुन्या पुलाकडे जात होत्या. मारुती मंदिर शेजारी नगरकडून आलेल्या एम एच १२ यु एस ८४९२ या ट्रॅक्टर व एम एच १२ ए एक्स ८११६ या ट्रॉलीने त्यांच्या दुचाकीला जोरात धडक दिली. या अपघातात हेमलता सुनील खरपुडे (रा. करंजेनगर, शिक्रापूर) या जखमी झाल्या, तर रुद्र सुनील खरपुडे (वय १२) याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.या प्रकरणी संपत प्रकाश रासकर (वय ३८, रा. शिक्रापूर) यांनी शिक्रापूर पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी अज्ञात ट्रॅक्टर चालकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार विश्वांबर वाघमारे करत आहेत.

# आचारसंहिता लागताच पिंपरी-चिंचवडमध्ये प्रशासन 'ॲक्शन मोड'वर; एकाच दिवसात ४८१९ अनधिकृत फ्लेक्सवर कारवाई

**पिंपरी । प्रतिनिधी**

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा होताच पिंपरी-चिंचवड शहरात आदर्श आचारसंहितेची कडक अंमलबजावणी सुरू झाली आहे. आचारसंहितेचे उल्लंघन टाळण्यासाठी महापालिका प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली असून, मंगळवारी (दि.१६) दुपारी तीन वाजेपर्यंत शहरभरातील तब्बल ४ हजार ८१९ अनधिकृत राजकीय फ्लेक्स, बॅनर्स आणि फलकांवर कारवाई करण्यात आली.




राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर रोजी निवडणुकीची अधिकृत घोषणा केली. त्यानंतर तात्काळ लागू झालेल्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर, महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने ही धडक कारवाई सुरू केली आहे. शहरातील प्रमुख चौक, मुख्य रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि शासकीय इमारतींच्या परिसराचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. यामध्ये केवळ फ्लेक्सच नव्हे, तर राजकीय किऑस्क, स्टिकर्स, होर्डिंग, पक्षांचे ध्वज, भिंतींवरील जाहिराती आणि फलक हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पडण्यासाठी राजकीय पक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. तसेच, भविष्यात आचारसंहितेचा भंग होईल असे कोणतेही साहित्य लावू नये, असा इशाराही देण्यात आला आहे.

# जेजुरी पोलीस ठाण्यातील हवालदार एसीबीच्या जाळ्यात

**जेजुरी । प्रतिनिधी**

जेजुरी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलीस हवालदाराने जामीनपात्र वॉरंट रद्द करून देण्यासाठी लाच मागितल्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे घटकाने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणात पोलीस हवालदारासह एका खासगी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

दशरथ शिवाजी बनसोडे (वय ५७, पोलीस कॉन्स्टेबल, जेजुरी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण) आणि सचिन अरविंद चव्हाण (रा. चव्हाण वस्ती, वाल्हे) या अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. तक्रारदार (वय ५९, व्यवसाय - कापड व्यवसाय) यांच्या मुलाने सन २०१९ मध्ये सावकारकी कायद्याअंतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्यात तक्रारदार व त्यांच्या पत्नी साक्षीदार होते. त्या प्रकरणात तक्रारदार व त्यांच्या पत्नीविरोधात जामीनपात्र वॉरंट निघाले असल्याचे सांगून, ते रद्द करून देण्यासाठी २ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. ५ डिसेंबर रोजी आरोपी पोलीस हवालदार दशरथ बनसोडे व सचिन चव्हाण हे तक्रारदाराच्या घरी गेले असता लाचेची मागणी करण्यात आली. याबाबत तक्रारदाराने दि. १० डिसेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे येथे तक्रार दाखल केली. तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि. १० डिसेंबर रोजी पडताळणी कारवाई केली असता, आरोपी पोलीस हवालदार बनसोडे यांनी २ हजार रुपयांची लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. तसेच सचिन चव्हाण याने लाच देण्यासाठी तक्रारदारास प्रोत्साहन दिल्याचेही निष्पन्न झाले. यानंतर दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सहाय्यक पोलीस आयुक्त भारती मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शैलजा शिंदे (लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे) करत आहेत.

# बनावट नंबर प्लेटची स्कूल व्हॅन जप्त; बाणेर-बालेवाडीत आरटीओची मोठी कारवाई

**पुणे ।। प्रतिनिधी**

पुणे आरटीओने मंगळवारी (दि. १७) केलेल्या विशेष तपासणी मोहिमेदरम्यान बनावट नंबर प्लेट लावून धावणारी एक स्कूल व्हॅन बाणेर, बालेवाडी परिसरात आढळली. ही व्हॅन रस्ता सुरक्षा पथकाने जप्त केली. याप्रकरणी स्कूल व्हॅन मालकावर बाणेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. आरटीओच्या या कारवाईमुळे अवैध वाहतूक करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.




विद्यार्थी सुरक्षा लक्षात घेउन आरटीओ अधिकाऱ्यांनी ही स्कूल व्हॅन जप्त केली असून, शासनाची फसवणूक आणि विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका पोहचवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल स्कूल व्हॅन जप्त करून मालकावर बाणेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले आणि सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी युवराज पाटील यांच्या मार्गदर्शनात आरटीओच्या 'रस्ता सुरक्षा पथक-०२' ने ही कारवाई केली. बाणेर परिसरात स्कूल बसची तपासणी सुरू असताना, एका बसचा क्रमांक संशयास्पद आढळला. सखोल चौकशी केली असता, या बसवर चक्क बनावट नंबर प्लेट लावल्याचे समोर आले. पथकाने तातडीने वाहन जप्त करून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. या विशेष मोहिमेतील पथक क्र. २ मध्ये मोटार वाहन निरीक्षक स्मिता कोले, तृप्ती पाटील आणि सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक कांचन आवारे, शुभम पाटील यांचा समावेश होता. या कारवाईनंतर अर्चना गायकवाड यांनी शाळांना कडक सूचना दिल्या आहेत. शहरातील सर्व शाळांनी त्यांच्याकडील वाहनांची माहिती तत्काळ ीलहेश्रर्लीीरिषर्शूीपिश. ेस या पोर्टलवर भरणे अनिवार्य केले आहे. वाहनांच्या कागदपत्रांची पडताळणी करून त्याचा अहवाल आरटीओकडे सादर करावा, असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले आहे.